१२२८१

म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय बा० वा०
दा. क. १२२८१

IRBK-0112281

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय का० वा०
दा. क्र. 92289

# भूक लाडू तहान लाडू

( लहान मुलांसाठी चटकदार गोष्टींचा संग्रह )

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा.
अनुक्रम...४.१२०८. वि. बालवाङ्मय
क्रमांक....३२४९....नोंद दि. २४/३/८५

लेखिका
डॉ. सरोजिनी बाबर

IRBK-0112281

सुविचार प्रकाशन मंडळ

प्रकाशक :
श्या. श्री. वनहट्टी
सुविचार प्रकाशन मंडळ
धनतोली, नागपूर १
४६१।४ सदाशिव पेठ
टिळक रोड, पुणे २

सर्व हक्क लेखिकेच्या स्वाधीन

चित्रकार : श्री. शि. द. फडणीस

प्रथमावृत्ती : जानेवारी १९६८

मुद्रक :
चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय
'शिव-पार्वती'
४६१।४, सदाशिव पेठ
टिळक रस्ता, पुणे २

१२२८१

*ज्यांच्या घरी*
*कधीच गोष्टींची*
*वाण पडत नाही*
*त्या सर्व बालमित्रांना —*

१२२८१

## तर सांगायचं म्हणजे—

कुणाला कशाचं तर कुणाला कशाचं असं वेड असतं बघा. आम्हाला आपलं गोष्टी ऐकायचं आणि गोष्टी सांगायचंच जबरदस्त वेड हं! अगदी लहानपणापासून. तशी एकदा काय गंमत झाली की, आमच्या सुंदरीला पंचमीसाठी सासरहून माहेरी आणायची होती. म्हणताना आमच्या आजीनं थोरल्या बंडूदादाला पागेतला शेलका वारू घे म्हटलं न् जा म्हणाली पोरीला आणायला. तर हा बरं म्हटला न् पोराची जात म्हणून आजीनं त्याच्यासंगं बुत्ती देताना भूक लाडू तहान लाडू पण दिले! पण त्या वेळी या लाडवांची चव आम्हाला जशी कळलीच नाही. संगं कांही दिसत तर नाही न् हा तर मिटक्या मारतेला! त्यामुळं आम्हाला पडलं कोडं. तशी मग परवा परवा त्यातला खुलासा मिळाला. ऐकणारांची तहानभूक हरपून टाकणाऱ्या फक्कडशा गोष्टी आजीनं त्याच्याबरोबर दिल्या होत्या आणि त्या सांगून हा बंडूदादा सुंदरीच्या सासरच्या मंडळींवर ऐटी मारणार होता. त्या तालेवारीवर सारं गाव त्याचं कवतुक करणार होतं. म्हणून मग मी पण बेत केला की, त्यातली थोडी शिदोरी घ्यावी न् आपणही आपल्या ओळखीतल्या पोरांना हे भूक लाडू तहान लाडू वाटून टाकावेत. झालं मग. आलं मनात न् घेतलं करायला वाटप. तर करा बघू बच्चे मंडळी तुमचा पण हात पुढं आणि घ्या यातला एकेक लाडू उचलून! चला, या पुढं न् उचला हा लाडवांचा डबा! उठा. जो 'हा लाडू खाईल तो खरा नशिबवान हं! कारण मग त्याला पण आजी गावाला नेणार आहे बरोबर! झोकात गाडीत बसवून!! अं! उगीच नाही.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.


सूचना :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करा
तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसा
प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

## अनुक्रम

| | | |
|---|---|---|
| १ | माझं भाषण झालं ! | १ |
| २ | आमचं हे असंच ! | ६ |
| ३ | आमची माणसं वेडीच हं ! | १२ |
| ४ | हिशोबाचे दिवस ! | १५ |
| ५ | आमची शक्ति आमचे सामर्थ्य | २० |
| ६ | अंगणातील दिवाळी | २४ |
| ७ | जाईजुई | २९ |
| ८ | फुटकी नाव तुटके दोर | ३२ |
| ९ | फूल नाही फुलाची पाकळी | ३८ |
| १० | आज देवाला उजाडलं ! | ४२ |
| ११ | आमचे जग | ४५ |
| १२ | जुनी पुस्तकं नकोत ! | ५५ |
| १३ | निळ्या कागदाचा तुकडा | ६० |

# १. माझं भाषण झालं!

" अग, मी व्यासपीठावर चढले मात्र आणि लोकांनी टाळ्यांचा कडकडाट करून सोडला. त्यासरशी क्षणभर मला भांबावल्यागत झालं पण मग मी ऐटीत उभी राहिले न् केली सुरुवात."



" अच्छा! आणि मग?"

" मग ' अध्यक्ष महाराज ', असं मी म्हटल्याबरोबर तिथल्या मध्यभागीच्या खुर्चीवर बसलेल्या माणसानं ' ओ ' म्हटलं न् माणसं पुन्हा हसली."

" बाई ग!.... कारण?"

" त्या वेळी कळलंच नाही. नंतर कळलं ते असं की लहान असून देखील मी किती धीटपणानं बोलले हे!"

" बरं मग बोललीस काय?"

" ऐक ना! तर काय गंमत झाली की, सुरुवातीलाच मी आपलं नाव चंद्रिका असं सांगितलं!"

" अय्या? खोटंच?"

" हं!.... भाषणातलं नाव अग हे!"

" आणखी?.... आडनाव?"

" अंहं!... चंद्रिका श्रीकृष्ण एवढंच बोलले."

" श्रीकृष्ण? हे कोण? भाषणातले वडील की आडनावाचे कोणी?"

" अग, आमच्या बाबांचं नाव बाळकृष्ण नाही का ? म्हणून ते बदलून ठेवलं श्रीकृष्ण ! "

" शाबास ! आणिक पुढं मग ? "

" नंतर मी सांगितलं की, माझ्या काकांचं नाव कुसुमाग्रज. "

" म्हणजे कवी आहेत ते ? "

" हो. का ग ? "

" ते कसे होतील तुझे काका ? इश्य ! "

" आणखी मावशीचं नांव संजीवनी, आजोबांचं नांव यशवंत असलं काय काय दिलं दडपून ! तर माणसं पुन्हा खूप हसली. "

" म्हणजे आता बक्षिसाच्या नावानं आवळ्याएवढं म्हणा ! ! "

" असूं दे. मग बरीक मी इंद्रपुरीची राहणारी असं सांगून समोरच्या मुलामाणसांची चंद्रसभा बसलीय असं म्हटलं ! "

" ये ऽ ऽ येडोबा ! ही काय कहाणी आहे का ? "

" ऐका ग ! मला असं आमच्या काकींनी घरात कधी तरी ऐकवलं होतं ते दिलं ठोकून वेळेला. "

" चांगलं आहे. मग भाषण भाषण म्हणजे हेच का तुझं ? ",

" नाही. ही झाली ओळखपाळख. दूधसागरात स्नान करून वोरकर मामांच्या घरी जाऊन आले असं म्हणाले आणिक मग केली सुरुवात खरी खरी."

" बरं हे कळलं. पुढं ? "

" मग मी शहाणी कशी ते सांगितलं. "

" अगोबाई ! .... " माझ्या बोलण्याचं माझ्या मैत्रिणींना भरपेट हसू लोटलं आणि मला गदागदा हलवून त्यांनी मला विचारलं की, मी झोपेत आहे की जागी म्हणून ! म्हणताना मग मी जागीच आहे म्हटलं न् माझ्या भाषणातली गोष्ट त्यांना सांगून टाकली. म्हणाले की, " तर मी शहाणी आहे असं आमचे घरचे खरे आजोबा का म्हणतात ते बोलले. " तशी एकजणीनं विचारलं, " हे खरं का खोटं बोललीस तू ? "

" खरं खरं. "

" का म्हणतात तुला शहाणी ? "

" एवढ्यासाठीच की मी सगळ्यांची सांगितलेली कामं बिनतक्रार ऐकते म्हणून. "

" काय नाही हं ! माझं ग कुठं ऐकलंस परवा मी तुला आपल्या बाईंना एवढं फूल नेऊन दे म्हटलं तर ? "

" वा ग वा ! आमच्या घरात फुलझाडं नाहीत हे बाईंना ठाऊक असताना मी कशी नेणार फुलं ? आणि आमच्याकडे मुलांच्या हातात पैसा नाहीत देत अग ! शिवाय तुझं नाव सांगते म्हटलं तर तू नको म्हणालीस. खरं ना ? "

" होच मुळी. मला शाळेत यायचंच नव्हतं त्या दिवशी. "

" बरं ते जाऊं दे. आणखी काय बोललीस ते सांग पहिलं. वाद नको गडे असा. "

माझ्या दुसऱ्या मैत्रिणीनं आमचं दोघींचं मधेच वर तोंड करतेलं बोलणं असं हटकलं. म्हणताना ते तिथंच सोडून मी केल्या भाषणाला सांगताना थोडं पुढं सरकवलं. म्हणाले, " आमच्या घरी परवा पावणेरावळे आलेवते. तर कुणाला त्यांची चिलीम शोधून दे, त्यावर विस्तव आणून दे.... "

" दे ठोकून हवं ते ! आता ग कोण चिलीम ओढतं शहाणे ? "

" ओढतात अग, खेड्यातील म्हातारी माणसं. " माझ्या बोलण्यावरच्या अविश्वासाला परस्परच उत्तर दिलं गेल्यानं मी पुढं बोलत राहिले, " तर कुणाला चहा प्यायला आणून दे, आंघोळीला पाणी विसणून दे तर कुणाला चालवत नव्हतं म्हणून हाताला धरून हवं तिथं नेऊन सोड, झालंच तर कुणाला अमकं अमकं घर दाखवून दे, कुणाचा कुणाला निरोप देऊन ये, कुणाच्या मुलांच्याबरोबर खेळत बैस तर कुणाला गाणं म्हण म्हटल्यावर ते म्हणून दाखव असली कामं मी बिनबोभाट केली. त्या नादात आईनं घरात धाकट्या बाळाला खेळव म्हटल्यावर आणि आजीनं ताक हालव म्हटल्यावर पण ऐकलं मी.... हं ! उगीच नाही ? "

" म्हणून का तू शहाणी ? "

" होच मुळी. आणखीन् घरात कुणाला त्रास न देता आठवडाभर मनानं आपली वेणी घालून घेतली, आंघोळ हातानं स्वच्छ केली, शाळेचा अभ्यास चोख केला. गृहपाठ लिहिला, कपडे नीट आवरले, घरात केरवारे केले, पाटपाणी केलं. झालंच तर काय ग ?.... "

" वा ! मला विचारतेस पुढचं?....घ्या!....बघा बाई, हिला आपणच केलेलं आठवतही नाही."

" हो हो असू दे. ऐक. झालंच तर लिहिलेलं टपाल पोस्टाच्या पेटीत नेऊन टाकलं न् कुणालाही समजणार नाही अशा बेतानं निजले उठले हे तर खरंच; पण गच्चीत जाऊन पोटभर गजगे खेळले चांदण्यात !"

" इश्य ! ह्याला म्हणतात ऐट अग आपल्याबद्दल बोलायची. भाषण नव्हे काही !"

माझ्या बोलण्यावर खदखदून हसत माझ्या मैत्रिणीने माझ्या पाठीत एक धपाटा घातला. तशी दुसरीनं तिच्यावर एवढाला एकेक डोळा करीत म्हटलं, " ऐकत कशी ग नाहीस तू पुरतं? उगीच मधे मधे बोलायचं ते? मला नाही खपत हे." त्या कारणानं सगळ्याजणीच गप्प बसल्या. आणि मी पण! तशी हळूच कुणी तरी बोललं, " भाषणाचा विषय काय दिला होता?" म्हणताना मी खुलासा केला, " मी!" ' आपण स्वत: ' हा विषय होता. हो." त्यासरशी एकजण बोलली, " मग बरोबर आहे अग."

" असंच होतं तर आम्हांला बोलवायचंस तरी! आम्ही आलो नसतो का भाषणात भाग घेतला नसता? तुझ्यापेक्षा छान भाषण दिलं असतं! हो हो!"

आमच्या मैत्रीणबाईंनी अशी आपल्या अकलेची तारीफ केली म्हणताना आमचे घरातले विसूकाका आत माजघरात होते ते आम्ही बसलोवतो तिथं सोप्यावर आले. त्यांनी एक वेळ आमच्याकडे पाहिलं न् म्हटलं कसं, " आत्ता प्रत्येकीनं आपापलं भाषण द्या. चॉकोलेट देईन. नवीन पुस्तकं देईन हवं तर बक्षिसाला. चला या पुढं." पण आता कोण बोलतंय्? काकांना बघून सगळयाजणीच गप्प राहिल्या न् एकमेकींना चिमटत सुटल्या.

त्यामुळे मग मी भाषणाचा उरला होता तो भाग त्यांच्या कानांवर घातला. विसूकाकांना पण ऐका म्हणाले. तशी त्यांनीच खुलासा केला, " कविमंडळींचं न् हिचं नातं मीच जोडलंय् हं! हिनं कविता लिहाव्यात म्हणून!!" आणि मग आम्ही पोटभर हसत सुटलो. त्या वेळी मी मनात म्हणाले की, कविता लिहीन की न लिहीन. पुढचं पुढं. आता भाषण तर केलं ना! बस्स!"

पुढं मग हसायचा भर जरा ओसरल्यावर काकाच बोल म्हणाले न् मी

पण बोलू लागले. म्हणाले कशी, " अग ना, भाषणाचा शेवट करायचा तर मी आमच्या आईचं नाव गंगा यमुना म्हटलं न् माणसं पुन्हा हसली ! पण काय ग चुकलं त्यात ? आईचं माहेरचं नाव गंगा न् सासरचं यमुना. बरोबर नाही ? "

हे ऐकून आमच्या मैत्रिणी हसल्या. पण मी आपली बोलतच राहिले, " आणिक सांगितलं की, मला गोष्टी सांगायचा न् ऐकायचा नाद आहे. आमच्या आजोबांना खूप गोष्टी येतात, तर मी त्या रोज ऐकते. त्या गोष्टीतील वाघसिंहांना अगर अक्राळविक्राळ राक्षसाला घाबरत नाही काही मी ! "

" तरी बरं हं, रडतेस झोपेत म्हणून ! " आमच्या काकांनी मला मधेच थांबवली. पण मी त्यांना दाद न देता आपली सांगतच राहिले, " अगर राजाराणींच्या डामडौलाला भुलत पण नाही. मी आपली ऐकते न् ऐकल्या गोष्टी मैत्रिणींना सांगत सुटते. "

" हां, एवढं खरं आहे. "

" शेवटी मग असं सांगितलं की, सर्वांनी आमच्या घरी उद्या सकाळी न्यारीला यावं. आईनं आमच्या पंक्तीला चंद्रसूर्यांना पण बोलावलंय !....तशी माणसं अशी हसली न् त्यांनी मला अशी शाबासकी दिलीय की विचारूच नका. बक्षीस मिळूं दे नाही तर जाऊं दे. लोकांनी भाषण छान झालंय म्हटलं. "

माझं बोलणं संपलं. म्हणून आईनं आमच्या हातावर ताजी भजी ठेवली न् काका काही बोलणार तर इतक्यात आमच्या शाळेचा शिपाई दारात उभा !

काकांनी त्याला का आलास म्हणून विचारलं तर त्यानं काय बातमी दिली ठाऊक आहे ?

तो म्हणाला की, मला पहिलं बक्षीस मिळालंय न् फोटो काढायचाय; तर मला न् काकांना शाळेत बोलावलंय म्हणून !

बाई बाई बाई ! खरं का हे ? का ही पण माझ्याच भाषणातली गोष्ट ? माझं मलाच गडबडल्यागत झालं न् मी बावरले तर आमच्या मैत्रिणींनी मला ' आहे ऽऽ बुवा ' करीत अशी डोक्यावर घेतली की त्यापुढं त्या बक्षिसाचा काय हो दिमाख ? नव्हे तुम्हीच सांगा मी म्हणते ते खरं का खोटं ?

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. वाचनालय शाखा.
अ. क्र. ९९८२०८ दि. ...........
विभाग ........... नोंद दि. ...........

# १. आमचं हे असंच !

आमच्या घरात शिकलेल्या माणसांचा जरा जादाच भरणा झालाय म्हटलं तरी चालेल. म्हणजे आमची आई शिकलेली, मामा शिकलेले, मावशी शिकलेली, वडील शिकलेले, काका शिकलेले न् आत्या पण शिकलेली. शिवाय आजोबा-देखील शिकलेले आहेत असं म्हणतात. आता हे सगळेच लोक काय शिकलेत ते हरी जाणे बाई. मला तरी त्यातलं कुणी शिकलेलं आहे माझ्यासारखं असं वाटत नाही. अं हं ! मग कुणी काही म्हणू दे.

अहो, ज्यानं उठावं त्यानं आम्हांला उठता बसता रागवावं तरी किंवा मारावं तरी ! हो ना ! मीदेखील शिकतोच आहे हे कुणाच्या ध्यानातच येत नाही. म्हणजे याला काय शहाणपणा म्हणतात ? सरळ बोलणं म्हणून नाहीच कुणाचं; तर मी तरी काय म्हणून ऐकावीत ह्यांची कामं ? खरं की नाही ?

परवा मी शाळेतून आलो हं !....काय ?....शाळेतून आलो तर दुपारची डबा खाण्याची वेळ. आईनं चटकन् मला काही द्यायचं की नाही खायला ? छे ! उलट



नुसतं केळं खा म्हणाली न् तिनं धाकट्या बाळाला खेळव म्हटलं ! तर मी चक्क नाही म्हणालो न् पळालो. तेवढ्यात आईनं मोठ्यानं ओरडून विचारलं, " पावणे दहा लाख म्हणजे किती ? काय लिहिशील गणिताच्या पेपरात ? " तशी मी मावशीनं सकाळी दिलेली लिमलेटची गोळी खिशातून काढून ती गट्टम् करीत ओरडलो, " तुला नको काळजी ! "

पण तिला मोठा राग आला. तिनं मला तिथूनच दरडावलं, " सांग की पावणेदहा लाख म्हणजे किती ? " मग मी खेळायला पळून जात पुन्हा ओरडलो, " दहा पैसे दे म्हटलं चॉकोलेट आणायला तर देत नाहीस. पैसे नाहीत म्हणून सांगतेस नाही का ? मग घरात पैसे नाहीत तर लाखांनी मोजायची गोष्ट विचारतेस कशाला ? "

झालं. त्यासरशी ती संतापली आणि धाकट्या बाळाला पाळण्यात टाकून जी खाली पळत आली ती मला मारायला म्हणून रस्त्यानं धावली; पण मी आणखीनच पळालो न् मग माझ्या मागं पळताना ठेच लागून ती पडली आणि तिच्या गुडघ्यातून रक्त आलं. तशी तिनं माझ्या नावानं दात-ओठ खाल्ले न् रडक्या आवाजात ' घरी ये म्हणजे दाखवते ' असं दणकेबाज बोलणं केलं.

तर मग मीच तिला घरी धरून नेली न् पोचवून दिली. पण माडीवर गेल्याबरोबर मात्र तिनं माझी पाठ जोरानं दणकली न् ' मर मेल्या, हो नापास ' असलं बोलणं केलं. तशी मग घरात आत्या न् मावशी काही करीत बसल्यावत्या त्यांनी पण बाहेर येऊन मला एकेक सटका हाणीत बोलून-बोलून घेतलं. म्हणून मग झोंबाझोंबी करीत त्यांच्या हातावर ओरखडे काढून मी माझी सुटका करून घेतली न् पळत जिना उतरून त्यांना सांगून टाकलं, " फार शहाणपणा नको. ठाऊक आहे अक्कल. " तर त्यामुळं त्यांचा मनस्वी अपमान झाला आणि मग त्या सगळ्या शिकलेल्यांची घरात सभा भरली म्हणे. सगळ्यांनी माझ्याबद्दल पोटभर बोलून घेत मला हव्या त्या पदव्या बहाल केल्या न् ठरवलं की, मला घरात घ्यायचं नाही संध्याकाळी म्हणून !

पण गंमत अशी की, शाळा सुटताना आमच्या धाकट्या चिंगीनं मला तिथं येऊन हळूच ही बातमी दिली न् सांगितलं की, मामांच्याकडे जा नाही तर वडिलांचा फार मार बसेल म्हणून. मला ते नेहमीच्या सरावानं खरं वाटलं न् मी चिंगीला घेऊन सरळ गावातल्या आजोळी गेलो.

तिथं मुलांनी गोट्या खेळायसाठी गर्दी पाडल्या होत्या न् आपापल्या गोट्या घेऊन खेळायला सुरुवात केली होती. आम्हाला बघून सर्वांना आनंद झाला न् तिथल्या मामांच्या सहदेवानं आजोबांना बातमी दिली की, वर्गातल्या तिमाही परीक्षेत माझा पहिला नंबर आला म्हणून !

त्यामुळं आजी आजोबा खूष झाले न् मामांनी खूप शाबासकी दिली. मामींनं शिरा करून खायला दिला न् विचारलं, " आज शाळा सुटल्या सुटल्या इकडे कशी स्वारी राजाभाऊ ? " तर मी काही न बोलताच भूक लागलीवती म्हणून शिरा खात सुटलो न् आजी असूं दे म्हणाली. " पोराची जात, आलं मनात की चालली मामांच्या घरी " असा मामांनी खुलासा केला न् माझा लाडानं मुका घेतला. मला एकदम बरं वाटलं. म्हणून मी मामांना विचारलं, ' तुम्ही किती शिकलात मामा ? ' तशी ते हसून म्हणाले, ' बी. ए. झालो. का ? '

" आणि आमची आई ? '

" इंग्रजी पाचवीपर्यंत ! "

" मावशी ? "

" मॅट्रिकमधूनच घरी राहिली. "

" आणि आत्या ? "

" इंग्रजी चौथी....पण कशाला ही पंचाईत आज राजारामा ? " माझ्या बोलण्याचं मामांना नवल वाटलं म्हणून मी उत्तर केलं, " शिकण्याच्या नावावर मला सारखी मारते आई !....आज फार मार करणार आहे म्हणून कळल्यावर मी इकडे आलो....पहिला नंबर आला तरी किती अभ्यास पाहिजे असतो आणखी ? " त्यासरशी सारं आजोळच दचकलं. म्हणताना चिंगी हळूच बोलली, " मी दादाला घेऊन आले. आई काल रागावलीय मामा. " त्या कारणानं मामांनी तिला पोटाशी धरलं न् आईचं बघून घेतो असा आम्हाला निर्वाळा दिला. म्हणून चिंगी पोरींच्यात खेळायला गेली न् मी गोट्या खेळायला म्हणून पळालो. त्यामुळं आमचं दप्तर तिथंच पडलं गणपतीच्या दिवळीखाली.

होता होता मग आमचा खेळ रंगात आला न् मधेच आईचा आवाज खणखणला, " कार्टं इकडे पळून आलं काय ?....थांब म्हणावं, घरी ये म्हणजे दाखवते "....आणि पाठोपाठ मामा पण गरजले, " आवाज बंद कर....पैला नंबर आलाय मुलाचा ! "

" काय करायचा नुसता नंबर येऊन !....उलटं बोलण्याला सीमा ? "

" तू आवाज बंद कर पहिला. "

" दादा, तू बोलू नकोस. "

" बोलणार ! "

" माझं डोकं फिरून गेलंय. "

" आणखी जाऊ दे. "

" तू पण त्याला सामील, अशानंच पोरं बिघडली....एकाला तरी वळण ! "

" तुझ्यापेक्षा खूप आहे....मिळवला होतास कधी पहिला नंबर ? "

" बोल तू हे मुलांच्या समोर !....म्हणजे माझी चांगली किंमत राहील ! "

" ठाऊक आहे कशी होतीस ते लहानपणी. " मामांनी फणकारून आईला तिच्या बालपणीची आठवण दिली न् ते बाहेर जायला निघाले. म्हणून आईनं पुन्हा त्यांना विचारलं, " पोरीचा पण पत्ता नाही. आणि दप्तर इथं टाकून गेला कुठं हा राजा ? "

" गेलाय खेळायला. का ? त्याच्या अंगाला कुणाचं बोट लागेल तर याद राखून ऐस ! " मामांनी आईला बजावले न् ते निघून गेले.

पुढं मग आई घरात गेली. मामीचं न् तिचं काय बोलणं झालं कुणाला माहीत. आजी–आजोबा काय म्हणाले ते पण कळलं नाही. म्हटलं जाऊं दे. मामांच्यापुढं कुणीच आवाज करणार नाही न् गेलो पुन्हा खुशाल खेळायला. म्हटलं आपलं हे असंच चालायचं.

रात्री मग मी घरी गेलोच नाही. आईबरोबर चिंगी परत गेली न् मी मामांच्या बरोबर चापून जेवलो. तर त्या वेळी मला आजी–आजोबांनी उलटं बोलू नये अशी आज्ञा केली, पण मी बोलले नाही. खाली मान घालून लहानग्या पितळेच्या खलबत्त्यात आजोबांचा विडा कुटून दिला. आजीचे पाय चेपले. मामीच्या देवाला नमस्कार केला आणि मामांच्याजवळ जाऊन निजलो हं ! तशी मला नीट पांघरूण घालीत मामा म्हणतात कसे, " आईच्याबरोबर वाद घालीत जाऊ नकोस. " तर मग मी पण उत्तर केलंच, " मग ती का मला बोलते सारखी ? "

" ती मोठी आहे. लहान मुलांनी उलटं नाही बोलायचं कुणाला. "

' नाही. पण मामा, खरं सांगू का ? '

" काय ? "

" की मला मार्क मिळतात ना खूप तर आई रागावतेच. मला वाटतं तिला कधीच असे मार्क मिळाले नाहीत म्हणून ती माझ्यावर उट्टं काढतेय. खरं की नाही ? "

माझ्या या बोलण्यावर मामा खूप हसले आणि मग मला ' वेडा आहेस ' म्हणाले. तर मग मी बोललोच नाही. पण मामा बोलले हं ! म्हणाले, ' आईचा राग राग करू नये. '

त्यावर मी म्हणालो, ' हो. मी कधीच करीत नाही. आज इथे का झोपलो तर आई वडिलांच्याकडून मार करणार आहे असं कळलं म्हणून. आई दावून काकांचे कान भरते न् काका मग अक्षरशः फोडून काढतात ! मामा, हे चांगलं का ? त्यांच्या शाळेत असलं शिकले ते ? '

" मी सांगेन त्यांना. "

" ऐटी करतात आपल्या शिक्षणाची. "

" असं म्हणू नये. "

" मार खायचा न् वर म्हणे उलटं बोलायचं नाही. शिवाय कामं करायची. '

" आता तुला मारणार नाही कोणी. "

" मी रोज इथे राहू का ? "

" चालेल. " मामांनी माझं बोलणं मानलं आणि त्यांनी मला नीज म्हटलं. म्हणताना झोपी जाताना मी मामांना म्हणालो, " मामा, पावणे दहा लाख म्हणजे नऊ लाख पंचाहत्तर हजार, तर आईला कळवून या की, मी हे गणीत परीक्षेत आलं नाही तरी लिहून दाखवलं गुरुजींना. आणि म्हणावं की, न रागावता जेवायला देत जा. " तशी मामांनी मला थोपटलं न् ते ' बरं ' म्हणाले.

मग मी तोंडावर पांघरूण ओढीत निजायच्या खटपटीला लागलो. पण झोप येईचना लवकर. निजताना आई रोज गरम दूध प्यायला देते त्याची आठवण झाली न् मग जीव उडून गेला. तशी मी लगेच उठून वसलो न् आजीजवळ जात ही गोष्ट काढली. म्हणताना आजीनं मला कपभर गरम दूध प्यायला दिलं न् नीज म्हणाली आपल्याजवळ.

पण सांगायचं तर मला कुठंच चैन पडेना. आईचं बोलणं न् रागावणं एवढं अंगवळणी पडलेलं तर सुनं सुनंच वाटलं. म्हणून उद्याच्या परीक्षेच्या अभ्यासाचं निमित्त काढून मी मामांच्याबरोबर आमच्या घरी त्या दिवशी गेलो हं !

बघतोय तर माझी भावंडं निजलेली. घरात सामसूम. आणि काकांच्याजवळ बसून ओसरीवर आई डोळे पुसतेली ! तशी मी काकांना विचारलं, " काय झालं काका आईला ? पाय घसरून पडली होती ते दुखतंय फार ? रक्तचंदन उगाळू ? " त्यासरशी दचकून आईनं मान वर केली आणि समोर मी दिसताच तिनं वाघाच्या झेपीनं मला आपल्या कुशीत ओढलं.

त्या वेळी असा आनंद झाला की, झालं गेलं सारं विसरून मी आईजवळ कबुलीजबाब दिला ' पुन्हा कधी उलटं बोलणार नाही ! ' म्हणून आणिक मुख्य म्हणजे तिनं पण माझा मुका घेत ' शहाण्यासारखा हा वागल्यावर मीसुद्धा कधी रागवणार नाही ' असं मामांना कबूल केलं आणि मग माझा पहिला नंबर आल्याबद्दल काकांच्याजवळ आणि मामांच्याजवळ तिनं एवढं वारेमाप कौतुक केलं न् माझ्याबद्दल असा अभिमान बाळगला की मी ' आ ' वासून तिच्याकडे पाहातच राहिलो ! शप्पथ ! नव्हे म्हणजे तीच का ही रोजची माझी आई ? विश्वासच बसेना कशावर ? त्या वेळी तिनं दिलेलं चॉकलेटदेखील घशाखाली नीट उतरेना तर !

मराठी ग्रंथ संग्रहालय. ठाणे. [illegible] शाखा.
अनुक्रम ७९९०७ दि ७।।७।।
क्रमांक ३३०१ नोंद दि २०।३।६८

# ३. आमची माणसं वेडीच हं !

मला आपला पतंग खेळायचा जरा असा तसा भरपूरच नाद हं ! म्हणून घरातील माणसांनी नको नको म्हटलं तरी मी रडून-आरडून का होईना पतंग आणतोच. पण दर वेळी पतंग आणायचाच नाही अशी आमच्या घरात प्रत्येकाने आवई उठवलेली. पण मी म्हणतो का नाही आणायचा पतंग ? हो हो, का नाही आणायचा ? पतंग खेळताना जर आम्हांला खूप खूप मजा वाटते तर नको म्हणून कसं चालावं ? नाहीच चालणार.

तर सांगायचं म्हणजे एक दिवस खूपच झालं. आमच्या माणसांनी मला कोंडून घातलं. बाहेरून कडी लावली व मी पक्का बंदिवान झालो. म्हणजे माकड-उड्या घेत साऱ्या रस्त्यावरून न् गच्चीवरून फिरायचा मार्ग रोखला-गेला. रड रड रडलो मी. वाटलं की, एकदम घराची कवाडं फुटल्याचा चमत्कार घडावा. म्हणताना-मला एक युक्ती गवसली. मला कोंडलं होतं त्या खोलीत भगवान् श्रीकृष्णाची एक तसवीर होती. मी त्या चित्रातील श्रीकृष्णाला हात जोडले. साष्टांग नमस्कारही घातला आणि सरळच मग त्याला विचारलं, " येशील का धावून माझ्या कामाला ? " आणि त्याच्याकडून उत्तर यायच्या आधीच मी त्याला आणखी सांगून टाकलं, " मला पतंग हवाय. आणून दे. गगनात उंच गेला पाहिजे पतंग. दोऱ्याचं भेंडोळं पण आण. हो आण. आणच. नाही तर मी तुला कृष्णदेव मानणार नाही. "

झालं. त्यासरशी आभाळ कडाडावं तसा आवाज झाला. मी एकदम घाबरून ओरडलो न् एका कोपऱ्यात जाऊन लपलो. मला काय वाटलं की, घरच गरजलं न् आता आपण धरणीत गडप होणार ? तर हो ! भीतीनं अंग असं थरारलं की काय सांगू ? छे ! माझी तर बोबडीच वळली.

तेवढ्यात काय झालं की, त्या तसबिरीत असलेला कृष्ण बाळरूप घेऊन आला न् त्यानं सोन्याची दोरी लावलेला, झालंच तर हिऱ्यामाणकांनी गुंफलेला असा चकाकता पतंग मला आणून दिला. शिवाय दोऱ्यानं गच्च भरलेली आसारी पण दिलीन् ! मग काय ! आमची चंगळ झाली न् मी त्याला म्हटलं, " तू खरंच कृष्णदेव आहेस. "

त्यामुळे तो आणखीनच खुलला. त्यानं आपल्या डोईवरच्या मुकुटातील

मोरपीस हलकेच नीट बसवलं. कमरेच्या शेल्यातील बासरी गच्च खोवली.



मनगटातील कडी मागं सारली. पायांतील पोलारवाळे नीट बसवले. दंडावरच्या बाजूबंदांवर फुंकर घातली न् आपल्या पीतांबराचा सोगा आवरीत स्वतः तो पतंग घेऊन धूम पळाला. म्हणून मी त्याच्यावर ओरडलो न् पतंग मागं खेचला. तर तो म्हणाला कसा, " अहं ! मागं हो. हो आणखी मागं. जा जा. हं, बस्स. पुरे. आतां मी पतंग उडवतो न् तू दोरीनं खेचून घे. पळ पळ ! " तशी मी त्याच्या म्हणण्याप्रमाणे केलं. त्यानं पतंग आभाळांत फेकला न् तो उंच जावा म्हणून दोरी खेचली. त्यासरशी पतंग उंच निघाला. असा गेला, असा गेला की, ढगांना पार छेदलंन् ! मी हरखून गेलो. वाऱ्याच्या मागून पळत सुटलो. कृष्णदेवही पाठोपाठ धावला.

होता होता मग माझ्या त्या पतंगानं चांदण्यांच्या दिशेनं झेप घेतली. तसा तो असा चकाकला की, पतंग न् चांदणी यातलं कोण कुठलं कळूनही आलं नाही बास. मला चेव आला. हातातील दोरी सुटत चालली न् पतंग उंचच उंच निघाला.


पुढं मग काय झालं की तेवढ्यात एक वायुयान तिथून भटकत भटकत आलं. तर आमच्या पतंगानं त्याला धडक देत त्याचं नाकच फोडलं! म्हण-तांना कृष्णदेवानं माझ्या हातातील दोरी आपल्या हातात घेतली न् पतंग खाली खेचला. त्या धांदलींत हत्तीसारख्या काळ्या ढगांचं पोट फुटलं न् धरणीवर पाऊस कोसळला.

पण आमच्या अंगावर त्या पावसानं फारशी झेप घेतली नाही. पतंगाच्या सावलीत मी न् कृष्णदेव लपून राहिलो.

तेवढ्यात पाऊस उघडला. ढगानं मांडलेली फळी मोडली न् सूर्यदेव चकाकला. बघतोय तर उजव्या अंगाला इंद्रधनुष्य आभाळात येतेय्! ते दिसताच मी जोरानं तोंडात बोट घालून शिट्टी मारली. त्यासरशी कृष्णदेवानं पतंग ओढला न् त्या इंद्रधनुष्याकडे तो झेप घेताच त्यानं माझ्या हातात ती दोरी दिली अन् स्वतः दिसेनासा झाला. त्या कारणानं मी जोरानं ती दोरी खेचली तर इंद्रधनुष्याला धडक्या देत पतंग जो वर उडाला तो थेट चंद्रावर! त्या वेळी अशी मजा आली, अशी मजा आली की, चंद्रसूर्यांनीही माझी पाठ थोपटली शाबासकी देत! हो ना?

तर माझं काय म्हणणं, ही गंमत ऐकायची सोडून देऊन आमची माणसं मला पतंग उडवू नको म्हणतात! का तर म्हणे मी पडेन, पतंग विजेच्या तारांना चिकटेल, अपघात होईल, भांडणं येतील न् अभ्यासातून लक्ष उडेल. मी म्हणतो घटकाभर काय बिघडलं असं काही झालं म्हणून? तर काय? पण मी सांगतो नाही होणार असं. नाही म्हणजे नाही. पण आमचं ऐकतं कोण? सदा न् कदा म्हणे पतंग नको! नको तर बसा म्हणावं खुशाल हाच गजर करीत! खुळे कुठले!! अस्सा राग येतो एकेकाचा म्हणून सांगू? पण कुणी डोळ्यातही मावत नाही डोळे वटारले तर, किंवा मी दाबून ओरडलो म्हणूनही कुणी दाद घेत नाही. थांबा, आता ही तसबीरच होती तशी करून त्यांच्यापुढे आपटतो न् ह्या कृष्णदेवाच्या साक्षीनं तरी मला पतंग देताहेत का पाहतो! बघू दे तरी हा मंत्र लागू पडतोय की, आणखी काही करावं लागतंय! काय रे कृष्णदेवा, फसवायचा नाहीस नव्हं ऐनवेळी? बघ हं नाही तर! खोटार्डा म्हणीन! मग तुझी पण आई तुला डांबून ठेवील. कोंडून ठेवील. हं! बस मग. त्यापेक्षा तू आपलं माझंच मधासारखं ऐक कसं! ठरलं ना? चला तर मग.

# ५. हिशोबाचे दिवस !




आमच्या घरात मुलाबाळांच्या हातात पैसाअडका कधी खेळलाच नाही. त्यामुळं आम्ही हिशोबानं वागलं पाहिजे, हा प्रश्न कसा निघतो हेही मला कळत नाही. एक तर खाऊच्या कारणानं आमच्या हाती येणारा पैसा त्याच्या खर्चासह पुढं येत असल्यामुळं हिशोबाची भानगड कधी निघालीच नाही आणि दुसरं म्हणजे अंकगणितातीलही हिशोब थोडे दिवस मागं गेलेले. म्हणताना आमच्या पाव्हण्या मुलानं आपण आता हिशोबानं वागलं पाहिजे म्हटल्यावर मला तर नवलच वाटलं हं !

खरं म्हणजे सुटीच्या दिवसांत आम्ही मोकळ्या मनानं मन मानेल तसं वागायचं हा आमचा स्वभाव. ही आमची सवय. हा आमच्या जगाचा व्यवहारधर्म. तर ह्याचं आपलं भलतंच. उलट बिनहिशोबी कारभाराचेच हे दिवस अशी आमची पक्की समजूत ! म्हणून मी त्याला म्हटलं देखील, “ दे सोडून ! मोठा आलाय हिशोब करणार ! ठाऊक आहे. ”

पण त्याला ते पटलं नाही. या सुटीत काही तरी विशेष करायचंच हे

गणित डोक्यात मांडून तो आलेला. तर त्याचं म्हणणं की, हिशोब हा हवाच. उगीच मनाला येईल तसं वागणं हे गैरहिशोबी म्हणे! शाबास! मग तुमचं-आमचं जमायचं नाही हं महाशय! हो, आपलं खरं सांगितलेलं उत्तम, नाही तर व्हायचा घोटाळा. म्हणताना आम्ही त्याला खुशाल हिशोब मांडीत बैस म्हणून दिला मधघरात सोडून न् गेलो अंगणात खेळायला.

तशी गंमत काय झाली की, तो पण आमच्या मागोमाग आला. म्हणून आम्ही त्याला खेळायला ये म्हटलं तर म्हणतो कसा, " माझं नीट ऐकून तर घ्या. मी खेळायला नको म्हणत नाही. "

" मग चल की खेळायला. पत्ते खेळतोस की कॅरम? नाही तर लंगडी, हुतूतू? काय? तुम्ही कोणता खेळ खेळता रोज रोज? " मी आपलं त्याला रोखीतच विचारलं,

" आमच्या शाळेत सांगतात की, सुट्टीत हिशोबानं वागावं म्हणून! '

" म्हणजे कसं? आपण अभ्यास करणार नाही. बोल पुढं. "

" अं हं। अभ्यासाचं नाही म्हणत केवळ. "

" मग कशाचं? "

" आमचे गुरुजी म्हणतात की, चांगलं वळण लागेल असं वागलं पाहिजे. "

" ते तर रोजचंच सांगणं प्रत्येकाचं. त्यात नवीन काय सांगितलंस? ठाऊक आहे. "

" अभ्यासाची सवय मोडू नये म्हणून चांगली पुस्तकं वाचावीत. काही चित्रं काढावीत. पोहायला शिकावं. वडील माणसांच्या हाताखाली काम करावं. त्यांचं ऐकावं. "

" अस्सं! आणि खेळावं केव्हा? "

" संध्याकाळी! वेळ उरेल त्याप्रमाणं. म्हणून काही छंद लावून घ्यावा. थोडे पैसे देखील मिळवायला शिकावं. "

" आणखी? फुकट वेळ घालवू नये. उनाडपणा पदरी येऊ नये. "

" अच्छा! पुढं? "

" तर असं काही ठरवून वागावं म्हणजेच हिशोब मांडून कार्यक्रम ठरवावा. "

" समजलं ! "

" छे ! नुसतं समजलं नको. आपण तसं वागू या. "

पाव्हण्याच्या या ठसकेबाज वाक्यानं आम्ही चमकलो न् त्याला साफ सांगू टाकलं की, जमायचं नाही म्हणून.

त्यावर आमची मोठी ताई आम्हाला मधल्या वेळचं खायला या म्हणीत बोलते कशी, " बरोबर आहे बंडूचं. प्रत्येक मुलानं तसं वागलं पाहिजे. "

आता आली का पंचाईत ! तिचं काम ऐकलं नाही म्हणून सकाळी तिचा मार खाल्लेला. त्यात ही भर म्हणून आम्ही गप्प बसलो. का तर बंडूला उद्देशून मी बोलो तरी ते बोलणं आम्हा सर्वांना लागू पडणार होतं ना ! तर आपण बोलून नसती कामं अंगावर ओढून घ्याच कशाला ?

पण ताई वस्ताद ! तिनं आम्हांला पंक्तीत बसवलं न् पोह्यांचा चिवडा खायला देत म्हणाली, " ऐका रे गंमत. उगाच मधी मधी बोलून हाकारा नका घालायला लावू हं ! " तशी आम्ही चिवडा खातखात तिच्याकडे पाहिलं. वाटलं की, ती गोष्टी मोठ्या छानदार सांगते तेव्हा गोष्टच सांगेल. पण अं हं ! ती म्हणाली, " एका ओळखीच्याच घरात मी परवा गेलेली. तिथं पाच सात लहान मोठी मुलं. पण काय वळण म्हणता. "

तर हे ऐकून मला राहावलं नाही म्हणून मी म्हटलं हं, " हो. लोकांची मुलं तेवढी सर्वांनाच चांगली न् आपली वाईट. "

परंतु ताईनं मला गप्प बसवीत पुढं म्हटलं, " ऐक तर खरं पहिलं. शाळा सुरू असली म्हणजे काही काही गोष्टींचा हिशोब लागत नाही, तर सुटीत तो लागावा. "

" हां ! म्हणजे आमचा खेळ बंद ! असंच की नाही ? "

" नाही. मी ज्या घरी गेलेवते तिथल्या समोरच्या भिंतीवर वेळापत्रक होतं ! "

" कसलं ? शाळेचं वेळापत्रक घरी देत नाहीत ! "

" शाळेचं नव्हे. घरचंच. त्यात प्रत्येक मुलानं रोज काय काय काम करायचं त्याचं गणित मांडलं होतं. "

" आणखी ? "

" म्हणजे वाढायचं कुणी– "

" मुलींनी वाढायचं ! त्याला गणित हवंच कशाला ? आईचा हुकूम बस्स होतो. "

" तेच तर. मुलगा अन् मुलगी हा कामात भेद नाही. मुलांनी पण वाढायचं. पाटपाणी करायचं. भाजी आणायची. निवडून चिरून द्यायची. सांगेल ते काम करायचं. शिवाय केरवारा, सडा हे निराळं. आणखी त्याखेरीज वाचन वेगळं. "

" म्हणजे खेळाला तेवढा फाटा. "

" नाही. रोज खेळायचं पण सक्तीनं. "

" म्हणजे तरी बरं. आणखी वाचन कसलं ? "

" चांगल्या गोष्टींचं. "

" आणि पुस्तकं ? "

" मिळतील. "

एवढे बोलून ताई निघून गेली. म्हणताना पावणा मुलगा कसा म्हणतो, " अरे, आपण असं काम केलं की, आईला थोडी फार सुट्टी मिळते ! हं ! म्हणून ! ! "

आता मात्र आमची कळी जरा खुलली न् आम्ही सांगून टाकलं, " आईचं काम करावं. पण एका अटीवर. तिनं रोज गोष्ट सांगावी. आमच्या आईजवळ पोत्यानं गोष्टी आहेत. "

" अरे हो. ही कल्पना चांगली आहे, तरी देखील आपण छान छान पुस्तकं वाचू या. "

" आणिक घरं बांधायची, किल्ले करायचे, चित्रं काढायची हे तर करायचंच. "

" शिवाय एक करायचं का ? "

" काय ? "

" आपण रोज दहापंधरा घरातून वर्तमानपत्रं टाकायची. लवकर उठायला होईल न् ओळखी करताना थोडे पैसे पण मिळतील. "

" छान ! ठरलं मग. "

" मग लिहून काढा कोणी काय करायचं ते. "

" छट् ! आमच्या आठवणीवर आमचा विश्वास आहे. " मी असं खाड-दिशी उत्तर दिलं आणि पुढची बात पुढे म्हणत खेळायला चला म्हटलं. तशी आमची ताई घरातून ओरडली, " थांबा ! " त्यासरशी आम्ही थबकलो आणि चिडून ताईला प्रश्न केला, " सतरांदा काय हे मधी मधी ? "

त्यावर शांतपणे बाहेर येऊन आमच्या हातावर चॉकलेट ठेवीत तिनं सांगून टाकलं, " आपला सदूमामा येणार आहे. सुट्टीत तो गाणं शिकवील. " म्हणताना आम्हाला जो आनंद झालाय की विचारू नये. म्हणून मी पावण्या मुलाला म्हटलं, " ये, हिशोब मांडला, आता पुढं बोल. " तशी तो मनापासून हसला आणि आमच्या पुढं खेळायला निघत बोलला, " मोठ्या लोकांचा आदर्श ठेवून वागावं असं आमची आई म्हणते. तू कोण होणार आहेस पुढं ? "

त्यामुळं मला बोलणंच भाग पडलं. " शिक्षण संपल्यानंतरचा तो हिशोब आहे. आत्ता वाद नको. " आणि आम्ही खेळायला सटकलो तर तेवढ्यात आमचे बाबा सदरेतून गरजले " उन्हात फार खेळायचं नाही. " आणि आम्ही हे रोजचंच आहे असं पुटपुटत तिकडं दुर्लक्ष मात्र केलं नाही. उलट अंगणातून ओसरीवर आलो आणि सरळ खो खो हुतूतूचा डाव तिथं मांडला. मग कोणी घर डोक्यावर घेतलंय म्हटलं तरी दाद द्यायची नाही हे पक्कं ठरवलं न् त्याच हिशोबानं पोटभर खेळलो देखील !....

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. वाचनालय शाखा.
अनुक्रम ४९२०७ ... वि ८११:९१० ....
क्रमांक २३२४१ ...... नोंद दि २४/२/६८

# ७. आमची शक्ति आमचे सामर्थ्य

वडील मंडळींच्या पुढं आम्ही कधी बोलायचं नाही अगर त्यांच्याबद्दल कुणाकडेही कधी तक्रार करायची नाही असा आमच्या घरचा रिवाज, म्हणून आम्ही आपले गप्प राहातो. नाही तर आम्हांला पण नक्की कळतं की, आम्ही कोण आहोत अन् आमची काय लायकी आहे ती. तर आमचं म्हणणं की, एकदा वडील मंडळींनी आमच्या लायकीची जरा विचारपूस करावीच.

एकदा मधे पुण्यात जातीय दंगल झाली हं ! त्या वेळी ज्यानं उठावं त्यानं आपलं आम्हा मुलांनाच, ' बाहेर जायचं नाही, डोकावून बघायचं नाही ' असा दम दिला. आम्ही म्हटलं ठीक आहे अन् बसलो घरादारातच घुटमळत; पण आमच्या घरातील मोठी मुलं आणि माणसं एकसारखी घराच्या दारात नाही तर रस्त्यावर ! असं एकही घर निघालं नाही की, मुलांच्यापेक्षा मोठ्यांनीच डोकावून पाहात किंवा रस्त्यावर धावून येत संचारबंदीत व्यत्यय आणला नाही. अहं ! खिडकीतून, दारातून, गॅलरीतून, जाळीतून, वाड्यातून अशी आपली सगळी डोकावताहेत बाहेर. जसं काही एखादं ' नवलच ' विकायला आणलं आहे कुणा जादुगारानं !

पण आम्ही दहाच्या वयाच्या आसपासची मुलं मोठी आज्ञाधारक निघालो. घरातून बाहेर नाही गेलो. कारण आम्हांला सवय ना मोठ्यांचं ऐकायची !

तर त्या वेळी आठवण झाली. मध्यंतरी कुणाचा तरी एक लेख लहान मुलांच्या मासिकात आलेला होता. त्यात ' प्रत्येक लहान मूल म्हणजे एक प्रचंड सामर्थ्य आहे असं म्हटलं होतं. ' या वेळी आम्हांला ते खरं वाटलं. आमच्या वाड्यापुरतं सांगायला हरकत नाही. आम्ही या वाड्याच्या दाराबाहेर म्हणून संचारबंदीच्या काळात मुळीच गेलो नाही. त्यामुळं पोलिसांची गाडी आली की, रस्त्यावरून होणारी पळापळी आम्ही केलीच नाही. आम्हाला ठाऊक होतं की, आम्हा मुलांना कोणी पकडणार नाही. फार तर ' मुलांना घरातून सोडू नका, ' एवढा आमच्या घरी पोलिसांकडून दम दिला जाईल; पण घडलं ते नेमकं उलटं. पोलिसांनी आमचा संयम वाखाणला !....आणि ढिल्या केल्या जाणाऱ्या संचारबंदीच्या काळात आम्ही दुकानातून धावाधाव करीत पळत जाऊन येऊन हव्या त्या आणलेल्या वस्तूंच्यामुळं आम्हांला घरातही कधी नव्हे ती शाबासकी मिळाली

त्या वेळी अशी गर्दी असायची की, पुढं जाईल कोण मोठं माणूस रांगेत उभं राहून नंबर लावायला ?

काही दिवसांपूर्वी पुण्यातील लोकांना संभाव्य बॉंबहल्ल्यापासून संरक्षण कसं करावं ह्याचं प्रात्यक्षिक दाखविण्यात आलं. होमगार्ड्स्नी ते केलं. त्या वेळी पेटत्या घरातून उड्या मारण्याचं काम आमच्या वयाच्या दोनतीन मुलांनी अप्रतिम केलं ! ते बघून मनात आलं की, वेळप्रसंगी आमचा उपयोग केवढा अन् आमचं धारिष्ट्य पण किती दांडगं ! म्हणतात की, बेचाळीसच्या लढ्यात खेड्यापाड्यांतून आमच्या वयाच्या मुलांनी आपापल्या गावांचं रक्षण केलं ! गावशिवेवर पहारा केला. चोरपावलांनी येणारांना घेरलं आणि तमाशा-मैफली करून गाफील राहणारांचे डाव उधळून दिले !....तर आमचं म्हणणं की, खरं संरक्षक दल आमचं उभारावं. मुंबई-पुण्याप्रमाणं रस्त्यावरच्या रहदारीचे नियंत्रक म्हणून ठराविक गणवेशातील आम्हा मुलांना गावोगाव नेमलं जावं ! त्याचा परिणाम होतो. आम्हाला दुखापत होईल म्हणून रहदारी काळजी घेते आणि वयाचं कौतुक केलं जातं.

बालवीरांची एक चळवळ आमच्या वयाला आणि उत्साहाला मानवणारी अशी आहे. मोठ्यांचे संदेश पोहोचते करावेत, जरूर त्यांना वाटाडे होऊन मार्गदर्शन करावं, पडेल ते काम उचलावं, केरकचरा दूर करावा, खरं बोलावं, दुसऱ्याच्या उपयोगी पडावं वगैरे वगैरे अनेक गोष्टी बालवीर करू शकतो. त्याच्या अंगी ही केवढी शक्ती कमावली जाते. त्या शक्तीचा उपयोग आम जनतेला फार होतो. समाजात माणुसकी यायला हे चांगलंच उपगोगी पडतं. म्हणून आमचं म्हणणं, आम्हांला असलं शिक्षण देऊन आमची पारख व्हावी. उगाच उनाडक्या तेवढ्या बघून रागवू नये मोठ्यांनी. उनाडक्या सुचतात त्या उद्योग नसतो म्हणून, हे साधं गणित नाही का ?

ज्या वेळी निवडणुका येतात त्या वेळी आम्हा मुलांचा केवढा उपयोग होतो. घरोघरी पत्रकं पोचवायला, सायकलवरून निरोप आणायला, मिरवणुकीत प्रचाराच्या वाक्यांचा जयघोष करायला आणि धाडसीपणानं हवं तिथं जाऊन सांगतील ते काम उरकायला आम्हीच खरे उपयोगी पडतो. निदान त्या वेळी तरी आमच्या सामर्थ्याची पारख व्हावी असं आपलं आमचं म्हणणं. अशा कामी आम्ही काढता पाय घेतला अन् नाही कुणाचं ऐकायचं म्हटलं, तर मोठ्या माणसांच्या फजितीला पारावार उरणार नाही ! ! खरं ना ?

आता रोजचं घरातलं देखील पहा हं! आम्ही जर शांत राहिलो नाही तर घर डोक्यावर आलं म्हणतात; आणि घरात नसलो तर तेच घर खायला उठतं म्हणतात. म्हणजे पाहा, आमच्या हालचालींवर आमचं घर चालतं असा नाही का




याचा अर्थ लागत? घरात कोणीही काम सांगावं आणि ते आम्ही बिनबोभाट करावं, त्यामुळं कामाचा पसारा अन् ढीग भराभर बाजूला होतो! आम्ही हे मनावर नाही घेतलं तर आम्हांला मार बसतोच पण मोठ्यांची भांडणं लागतात!

शाळेत तर आमचा केवढा थाटमाट म्हणावा? उभी शाळा आमच्या तालावर चालावी अशी वस्तुस्थिती असते. शांत राहून आम्ही शिकतो आणि गुरुजींना त्यामुळं लौकिक मिळतो असा आमचा नित्याचा अनुभव आहे.

परवा आम्ही सहलीला गेलो होतो. तर एका ओळीत शिस्तीनं चालणाऱ्या आम्ही, जेव्हा फर्लांगभराचा रस्ता अडवला तेव्हा लोकांनी किती शाबासकी

दिली ! विचारा आमच्या गुरुजींना ! पुरी फुगल्याप्रमाणं त्यांचं मन अभिमानानं फुगलं. उगीच नाही ! तोच आम्ही दंगा केला असता तर गुरुजींनी आम्हांला ठोकून काढीत स्वतःचं डोकं धरून बसण्यापलीकडे काय केलं असतं ? म्हणून आमचं म्हणणं, आमची शक्ती दांडगी आहे. त्यासाठी वडील मंडळींनी आमचं मन गुदमरून जाणार नाही एवढं पहावं. उत्साहाला वाव द्यावा. काही चांगलं करायला घेतलं तर त्यात खो घालू नये आणि आमच्या वयाला शोभणारा थोडाफार अवखळपणा अंगी बाळगला तर, पोराची जात आहे, या अभिमानानं त्यात मोठे-पणा मानावा ! मग पहाच म्हणावं की, आम्ही जसं तुमच्यामुळं मोठे होतो तसेच आपणही आमच्यामुळं नावलौकिकाला पोहोचता किंवा कसं ते ! खोटं नाही सांगत. हा अनुभव आहे आणि त्याला सत्याचा आधार आहे. त्यात आमचाच उभयतांचा आनंद सामावलेला आहे आणि सुखाच्या राशीचं मोजमाप खरं इथं होणार आहे !

मराठी ग्रंथ ... शाखा.
अनुक्रम................दि ................
क्रमांक.................नोंद दि..............

# ६. अंगणातील दिवाळी

" अरे शंभू, ऐकलंस का? अरे की नाही, आमच्या इथं आमच्या दारात आज पांडवांची सभा बसली आहे! येशील तू?"

" काय म्हणतोस? पांडवांची सभा? कसली असते रे?"

" जम्माडीची!"

" खरे पांडव येणार आहेत?"

" हं!"

" असं?... मग मी येईन. पण काय रे?"

" काय?"

" त्यांचं गांव कोणतं?"

" अं हं!"

" म्हणजे?

" तसलं ठाऊकबिऊक नाही."

" पण कोठून येणार आहेत पांडव? सांग की!"

" आमची ताई आणते त्यांना."

" अरे पण कोठून? गणपतीसारखं दुकानातून?"

" छट् छट! शेणाचे असतात पांडव."

" शेणाचे? आणि पांडव? तू मूर्ख आहेस."

" तू मूर्ख आहेस!! पांडव शेणाचे असतात."

" खोटं बोलतोस तू भार्गव! साफ खोटं."

" तू खोटार्डा आहेस. चल दाखवतो खरं करून."

आमच्या भार्गवचं आणि त्याच्या मित्राचं, शंभचं, बोलणं या रीतीनं जेव्हा वर्दळीवर आलं, तेव्हा मी मधे पडले आणि भार्गवनं जोरानं आवळलेली शंभूची मानगूट सोडवीत म्हणाले, " अरे शंभू, खरंच आमच्या घरी दिवाळीत अशी पांडवांची सभा बसते अंगणात. भार्गव खरं सांगतोय. तुमच्याकडे गौळणी नसतात का?" तशी भार्गवनं मानगूट ओढल्यामुळं सरकलेला आपला शर्ट नीट सावरीत शंभू म्हणाला, " अं हं! गौळणी कसल्या असतात हो? गोकुळच्या?"

" नाही रे! शेणाच्या करायच्या असतात. आम्ही पाच दिवस करतो गौळणी.

पहिल्यांदा विहिरीवर जाणाऱ्या, मग बाजार भरवणाऱ्या, नंतर घोळ्यामोळ्यानं एकमेकींना भेटणाऱ्या, सैंपाक करणाऱ्या, दहीदूध व भाजीपाला विकणाऱ्या, डोंगर चढून जाणाऱ्या, अशा अनेक प्रकारच्या गौळणी असतात. त्यांची आटपाट नगरातील पेठ असते. समोर वेस उभारतात. दारी शिंगाड्या असतो. बळिराम अन् त्याच्या पाच वायका असतात. दळणाऱ्या गौळणीदेखील करतो आम्ही अन् सरते शेवटी मग पाची पांडवांची सभा बसवतो. सहाव्वी द्रौपदी पण असते. ह्या सगळ्यांना फुलांनी व कापसाच्या रंगीत माळांनी सजवायचं असतं. तू ये बघून."

"येईन. मला वाटलं हा खोटं सांगतोय."

"छे! तो शहाणा आहे. खोटं नाही बोलत. त्याचा किल्ला पाहिलास क तू?"

"दाखवीतच नाही तो! मी पण किल्ला केलाय मावशी."

"शहाणा आहेस." आता शंभूचा राग बराचसा निवळला होता, म्हणून मी त्याच्या पाठीवरून हात फिरवला. तशी मग एवढा वेळ गाल फुगवून बसलेला भार्गव म्हणतो कसा, "ह्याच्यापेक्षा आमचा किल्ला सुरेख आहे. तो बघ शिवाजीराजा बुरजावर उभा आहे. पाहिलास? तू नुसती बोगद्यातून गाडी पळविली आहेस!"


"असू दे. प्रत्येकाचं वेगळंच हवं, तर खरी गंमत येते पाहायला. त्य रखमाकाकूंच्या मुलानं की नाही, आपल्या अंगणात पुण्याची सेनादत्त पेठ उभी केलीय! फार सुरेख. अंगणाला त्यामुळंच छान शोभा आली आहे." शंभूचं आणि भार्गवचं पुन्हा जुंपू नये म्हणून मी ही मधलीच बातमी दिली.

त्यामुळं मग ते दोघेही एकत्र आले आणि भार्गवच्या किल्ल्यासमोर खंदक तयार करून त्यात सोडायला म्हणून कागदाच्या बोटी करीत बसले.

तितक्यात काय गंमत झाली की, आमची शकूताई आपल्या ठकूताईला (भावलीला) घेऊन लबाक् लबाक् पावलं टाकीत तिथं आली. तिनं ह्या दोघांच्याकडे एक वेळ भुवया उंच करून पाहिलं व मग म्हणाली, "अरे, आमच्या रांगोळ्या पाहिल्यात का?"

"रांगोळ्यांत काय ग पाहायचं?" भार्गवनं शकूताईकडे नाक फेंदारून पाहिलं. तशी ती चिडली, "अरे वा! भांडकुदळ्या, रांगोळीत तर खरी मजा. आणि म्हणे रांगोळ्यांत काय पाहायचंय! येत नाही त्यात बोलावं कशाला?"

" जा जा ! शहाणी आहेस ! "



" भार्गव्या ! पुन्हा बोललास तर बघ हं ! "

" ये ऽगप रे ! "

भार्गवची व शकूताईची वर्दळीवर येणारी अशी भाषा झाली तशी शंभूनं भार्गवला चिमटलं. म्हणून मी त्या तिघांच्यामध्ये बसत ठकूताईला कुरवाळीत म्हणाले, " भार्गव, दुसऱ्याच ऐकावं. अरे, दिवाळीतील अंगण सर्वांनी सजवायचं असतं. ठिपक्यांच्या रांगोळ्या फारच सुंदर असतात. रोज रोज नव्या नव्या. आज सात ठिपक्यांचं कासव, तर उद्या दहा ठिपक्यांची कोयरी, तर परवा आठ ठिपक्यांचं वृंदावन व तेरवा आडवे उभे सात सात ठिपके मारून काढायचा वेलदोड्यांचा वेल. एकेक पाहातच रहावी रांगोळी. असं वाटतं की, रंगीबेरंगी पायघड्याच दारी आल्या आहेत. "

" मला येते वृंदावनापुढची रांगोळी. " शंभूनं असं उत्तर दिलं तसं मला बोलू न देताच शकूताई पुटपुटली, " छे ! रांगोळ्या पुरुष नाही काढीत ! तू काय सांगतोस थापाड्या !

त्यावर मग भार्गवनं आपली अक्कल चालवली, " ही खोटं सांगते. आमचे मास्तर हल्ली रांगोळ्या शिकवतात आम्हांला. स्वस्तिक येतं मला पण. "

म्हणून मीच मग बोलले, " शाबास, मग तर फार मोठी रांगोळी येते तुला. स्वस्तिक म्हणजे खुद्द सूर्यदेवाची बैठक. अरे ! शुभ मानतात ती. "

" म्हणून तर आमच्या आकाश कंदिलाच्या काठीच्या पायाशी आमच्या आईनं काढलं होतं ते. तुळशीपुढं तर रोज काढते आई असली रांगोळी. "

" शंभू, तुमच्या आकाश कंदिलाचं फार नाव निघतंय रे शाळेत ! काय भानगड आहे ? "

अरे, दादांनी झक्कपैकी विमान केलंय व त्यात दिवा बसवलाय विजेचा. विजेचं बटण दाबलं ना की एकदम इकडून तिकडे तरंगत फिरतं हे विमान. "

" झक्कास ! आम्ही पाहा चांदोबा केलाय आकाश कंदिलाला. खऱ्या चांदोबासारखा लहान-मोठा होत राहतो. तो बघ ! "

भार्गव आता खुशीत येऊन बोलत होता अन् आभाळात ढग आल्यानं थोडा थोडा अंधारही होऊ पाहात होता, म्हणून त्याचा हा आकाश कंदील शकू-ताईनं विजेचं बटण दाबून प्रत्यक्षच खराखोटा करून दाखविला. त्यामुळं सर्वांनाच खूप मजा वाटली.

इतक्यात काय झालं की, आमच्या शेजारच्या घराच्या गच्चीवरून रॉकेट-सारखं सुईऽऽऽ करीत आभाळांत जाणारं व चकाकणारं असं दारूकामातलं काही तरी आवाज करीत आभाळात जाताना आम्ही ऐकलं व पाहिलंही.

त्यामुळं आमच्या घरी भार्गवनं आणलेल्या फटाकड्या, फुलबाज्या, भुईनळे, चमनचिडिया, भुईचक्रं वगैरे सगळं सामान पेटीतून बाहेर आणीत शकूताई ओरडली, " आम्ही पण दारू उडवू या. चला रे. " आणिक तिनं जवळ घेतलेली ठकूताई माझ्यावर फेकून स्वतः धूम पळाली. मग मी तिनं घातलेल्या रांगोळ्यांवर हळदकुंकवाच्या ठिपक्या मारल्या. स्वतः सोळा ठिपक्यांचा गालिचा काढला, कमळ काढलं, चेंडू काढला.

तेवढ्यात चांगलीच तिन्हीसांज झाली होती. म्हणताना मग दुपारीच तेलवात करून ठेवलेल्या पणत्या काड्याची पेटी घेऊन पाजळल्या. शेणाच्या दीपमाळेला, अंगणातील पायऱ्यांना, कोनाड्यांना, तुळशीवृंदावनाला, गच्चीच्या कठड्याला, अशा अनेक जागी त्यांची मांडामांड केली.

त्यामुळं आमच्या अंगणाला भारी सुरेख शोभा आली. उरलेल्या दहा-पंधरा पणत्यांनी मग आम्ही भार्गवचा किल्ला आणि गौळणींचा वाडा देखील सजवला.

पांडवांची सभा पण मग त्यातून सुटली नाही. उलट या सभेसाठी विजेच्या दिव्यांची रंगीत माळदेखील मग भार्गवनं हलके हलके घरातून आणून लावली. त्याच वेळी आमच्या दारावरील विजेच्या दिव्याचं तोरणही शकूताईनं बटण दाबून लावल्या-कारणानं खूप मजा आली.

आमच्या अंगणातील दिवाळीची ही धांदल चालू होती, तोवरच आळींतील मुलांचा हा घोळका जमा झाला. आणि मग तुझ्या माझ्या घरच्या दिवाळीतील अंगणाची ज्यानं त्यानं अशी वारेमाप वर्णनं सुरू केली की, ऐकणाराला खरंच भूल पडावी !

त्यांतलं सगळंच काही मी आता सांगत बसत नाही, पण गंमत म्हणून नमुन्याच्या थोड्या गमतीजमती सांगितल्याशिवाय नाही बाई राहवत.

बरं का, तर सांगायचं म्हणजे असं की, आमच्या शेजारच्या चिमीनं आल्या आल्याच म्हटलं कसं, " अग ना, आमच्या आईनं आज पहाटेच्याच दारी गायी-म्हशी ओवाळल्या ! आणिक आम्ही ' दिन दिन दिवाळी, गायीम्हशी ओवाळी ' असली गाणी म्हटली. "

आणिक त्या विसूकाकांचा राजा कसा म्हणतो, " आमच्या घरी ब्रह्मपूजा झाली अन् लक्ष्मीपूजा पण आम्ही केली. मस्तपैकी पानसुपारी दिली मी. हा बघा त्यांतला बत्तासा. हवाय ? " तशी प्रत्येकानं " आण आण " करीत त्याच्या हातातील एका बत्ताशावर अशी झडप घातली की, त्या नादात त्याच्या हाताला ओरबाडून सुंदरामावशींचा रामू धूम पळून गेला ! त्यामुळं मग ह्यानं असं भोकाड पसरलं की त्याला समजावता समजावता माझा जीव बेजार झाला व मग ही मंडळी एकदमच पसार झाली बाई. तिथं अंगणातील रोपणाईच्या सोबतीला उरलो ते मग आम्हीच दोघं. म्हणून मग मी करंजी व चकली त्या राजाच्या हातावर ठेवीत बोलले, " मुलांनी असं रडू नये. मला नाही खपत. दोन घ्यावेत अन् दोन द्यावेतही. तरच दिवाळीतील अंगण खरं शोभा देतं. समजलं ना ? " त्या कारणानं राजा असा गोड हसला की, त्यापुढं ती सगळीच सजावट पार फिक्की पडली !....

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा.
अनुक्रम ....... वि...
क्रमांक ....२३२७...नोंद दि. ...

# ७. जाईजुई

माझे नाव जाई. माझे नाव जुई. ऐकलेस का ग सई? इकडे ये बाई. सांगितलेली गोष्ट नामी आहे लई. ऐकतांना म्हणशील बाई बाई बाई! असले आम्ही कुठे ऐकलेच नाही. पाहिले पण नाही.

तर काय गंमत झाली बघ हं! ही म्हणाली फिरायला चल. मी म्हणाले,



चल तर चल. म्हणताना मग आम्ही हिरव्या बैठकीवरून घेतली उचल. घातलेले फेकून दिले फतकल. अंगावरचे झटकले पाण्याचे थेंब चपळ. फिरायचा बेत केला पुष्कळ. अक्कल चालली बक्कळ. आणिक मग बाई निघालो, तर कोणसेसे म्हणाले, आलों आलों. आता काय करावे? कोण बरे बोलले असावे? म्हणून इकडे तिकडे बघितले. चहूकडे पाहिले. पण कोणीच नाही दिसले.

इतक्यात आल्या पाऊसधारा. मेघधारा. अंग भिजले भराभरा. तशाच मग निघालो तरातरा. जीव झाला बाई बाराहुरा. तर बाई अवचितच पुढे आला कसलासा डेरा. बघतोय तर लहान लहान झाडाझुडपांनी सोडलेला आपला थारा आणिक आमच्याबरोबर धावताना त्यांनी टाकलेला सुस्कारा. त्यांचे वाजले तीन तेरा. त्यांना अवचित पाय फुटले सतरा-अठरा. लागले घालायला चकरा. धरला त्यांनी फेर मनोहारा. अग बाई! हे रे काय देवा परमेश्वरा! ह्यांनी हा कसला मांडलाय नखरा?

झाले. काळीज उडून गेले. मन भुलून गेले. काही एक सुचेनासे झाले

तर तितक्यात मेघरायाचा बाळ आमच्याकडे धावून आला. खदखदून हासला आणिक पाण्याचा फवारा फेकून पळून गेला. आमचे अंग ओलेचिंब झाले. झाडा-झुडांच्या पायांशी नदीनाले वाहिले. धरणीमाईला मंगलस्नान घडले. तर तोवर तिकडून आला आंबा. घ्या म्हणाला साखरचुंबा. मारल्या त्याने उड्या धबाधबा. त्यासरशी आली चिंचबाई. तिने मांडली आपल्या शेंगांचे दागिने घडवायची घाई. घातली चुईफुई. तशी धांवली जास्वंदी. दिसली आनंदी. तिने घातला झिम्मा. त्यासाठी पुढे झाली कर्दळी अम्मा. त्यांनी घातला. धांगडधिंगा मनोहारी पिंगा. पूजली गीतगंगा. म्हणताना सगळीच झाडेझुडे आली पळत पळत. घाला म्हणाली अंगतपंगत. पळा फेर धरत. नाचा गाणी म्हणत.

आणिक मग बाई अशी गंमत झाली म्हणून सांगू सई ? गावोगाव उठली आवई. माणसे धावली ठाई ठाई. अशी काय घडली नवलाई ? झाला गलबला. नदीनाले म्हणाले, अरे पळा पळा. मेघधारा आल्या सळसळा. डोंगरदऱ्यांनी, कडे-कपारांनी घरदार सोडून बोलणे केले. बघू या तरी हा वानवळा ! असला कसला नाच घातलाय जगावेगळा ? कुणी आळीवल्या संगीताच्या नाना कळा ! अरे, पळा पळा. चला बघू या हा चोखा मेळा.

त्यासरशी उठली इंद्रलोकीची सभा, चंद्रलोकीची सभा. धरिणीवर काय घडले ? म्हणाले, कुणी तरी लवकरच सांगा. एकामागून एक अशा लागल्या देवा-दिकांच्या रांगा. मेघरायांच्या शिड्यांवरून खाली आली रंभा. अग बाई ! ही तर म्हणाली आगळी शोभा. कधीच पाहिली नाही. कुठेच ऐकली नाही. केव्हाच घडली नाही. जसे काय धरिणीलाच पाय फुटले हं ! वाऱ्याला जिभा फुटल्या हं !

आणिक काय सांगू सई तुला ? अग ना ही सगळीच लागली नाचायला न् बोलायला ! तशा आम्ही अगदीच आकसून गेलो ! ! काय बाई हा चमत्कार म्हणालो. आम्ही फिरायला जायच्या तर फिरणेच जणु आमच्याकडे आले की ग हे !

अग ना, तसा आला गजराज गवताचा तांडा. फळाफळांचा लागला लोंढा. आमच्या भोवती प्रीतीचा पडला वेढा. आम्ही खुळयाभैऱ्या होत लोळत सुटलो गडगडा.

त्यासरशी वानरांनी केले हूप ! माकडांनी मारल्या उड्या. पाखरांनी केल चिवचिवाट. वाघ-सिंहांनी ठोकली आरोळी. हत्तीघोड्यांनी आणल्या पालख्या. आणि आम्ही तर भरलो हलक्या. पण नाही हं घेतल्या डुलक्या. मेण्या-पालख्यांत

बसलो. चालली मिरवणूक. ताशा तर्फे वाजले. रंभा नाचल्या. शेलक्या वाऱ्यांनी रिंगण घातले. आणि मग आकाशातील तारांगणांतून असे काही झगमगाट निघाले की पुसूच नये !

सई ! अग पण हे सारे का ? कशासाठी ? सांगू ? आमची म्हणे निवड झाली. पसंती ठरली. आखणी केली गेली. आमच्या दरवळीने दाही दिशा धुंद झाल्या. गावोगावच्या वार्ता आल्या. आम्ही दोघी–जाईजुई–टिप्पूर चांदण्याची आमची कळा. गुंफल्या गेल्या मोहनमाळा. सजल्या नक्षत्रमाळा. देवपूजेला आमचाच निवडला गेला वानवळा. पारखून घेतला आमचा तोंडवळा. म्हणून झाला हा स्वागताचा सोहळा.

पण बाई, कशाची ही पूजा ? कोणत्या देवाची ही महापूजा ? का एवढा झाला गाजावाजा ?

सईराणी, ऐक ही कहाणी, हो शहाणी. हो गुणी. हो देखणी. हो शुक्राची चांदणी. अग, पूजा आमच्या देशाची. भारतमातेची. राष्ट्रभक्तीची. तुझ्या माझ्या स्वातंत्र्याची. ह्या आपल्या धरित्रीची.

तो बघ आला सूर्यदेव. तो बघ आला मेघदेव. झाली विचारांची देवघेव. कशी काय करावी त्यांची ठेवरेव ?

अग बाई ! सई ! मागे हो. हो गडे मागे ! त्या बघ आल्या मेघधारा. किती पण घालाव्या ह्यांनी अशा वरचेवर येरझारा ! चला चला, खट्याळ वारा आला. सोसाट्याने फुंफाट घालीत बघ तरी तो कसा चाललाय !

म्हणजे ? त्यांच्या मागोमाग ही झाडेझुडे पळाली ? अरे ! थांबा थांबा ! आणीन म्हणते तुमच्या एकी कर्दळीची शोभा. हं ! हं ! आले ध्यानात ! चल सई अग, पळ पळ. त्या बघ केळी नारळी जावा जावा· त्यांच्यावर झोपलेला पाखरांचा थवा. अगो बाई ! हा कोण आणखी आला नवा ? बोरीबाभळींनी कसला ग आणलाय मेवा ? अशी काय ग बवतेस जेवा तेवा ? चला आपण सगळ्याच खेळू या नाच नवा नवा ! नाही हं, कुणी कुणाला दाखवायचा बागुलबोवा. नाही तर गुलाबदादा, शेवंतीताई आणि जास्वंदीमाई देतील ठोक मार, होऊन जाऊ बेजार. छे बाई ! नकोच हा असला तेगार. त्यापेक्षा या पावसांत चलच, येऊ या फेरफटका मारून नखरेदार. मग पण इथे आपलं येणं घडू दे वारंवार आणि कोण पण कसलाही लेऊन येऊ दे शिणगार.

# ८. फुटकी नाव तुटके दोर

आमच्या गावात तालेवारीचे पावणे येणार आणि गावच्या शाळेचं उद्घाटन होणार अशी आवई उठल्याला आता महिना-दीड महिना झाला होता; पण तो नेमका दिवस परवा दिवशी उजाडणार होता ही बातमी आम्हांला गुरुजींनी काल परवा दिली होती. म्हणून कुणी गाण्याच्या तालमी करीत होतं, कुणी संवाद घोकत बसलं होतं, तर कुणी गुरुजी सांगतील ती समारंभाची तयारी करण्यात दंग झालं होतं. आम्ही आपले नेहमीप्रमाणं उरलंसुरलं न् आलंगेलं ह्या कामावर आपण होऊन रुजू झालो होतो. कपडेबिपडे लखख धुऊन इस्त्री करून ठेवले होते. कुणी कसं बोलायचं आणि कसं कसं वागायचं, याचा बेत करीत शाळेतल्या अंगणातलं गवत खुरपीत बसलो होतो. तर अवचितच काल संध्याकाळी पाऊस आला. वाजतगर्जत. मुसळधारीनं. एकेक गार लिंबाएवढी पडलेली, साऱ्या कमानीपताका भिजून गेल्या. हवेत गारवा आलेला. उकाडा परतलेला, रस्ते विसावलेले. घरं भरलेली. माणसं काकडलेली. रस्ताभरून पाणी वहातेलं! आता समारंभ कसा होणार? प्रत्येकाला चिंता पडलेली. ज्याच्या त्याच्या तोंडी हाच एक विषय घोळत होता.

तर त्या धांदलीत आमच्या गळक्या घरात आमचं त्रिकूट बसलेलं. दादा, विठू आणि रामजी. त्यात मी एकली वाळूबाई चौथी. भिजल्या घरात न पेटणारी चूल फुंकीत ह्यांना चहा करून देतेली. दारात पाऊस सुपानं ओतलेला. तशातच आमचं बोलणं चाललेलं.

"पावणे येणार कसे?" रामजीनं आमच्याजवळ प्रश्न काढला.

"नदीनाले भरून चाललेत." विठूनं खुलासा केला.

"आमच्या गावात असले पावणे पहिल्यांदाच येणार, तर त्यांना आणावं कसं?" दादाला कोडं पडलं.

"नदीच्या पल्याडली नाव फुटकी आहे." मी माहिती दिली.

आम्हांला चिंता वाटली. गुरुजींनी काय सोय केली असेल? पावणे भर पावसात येतील का? आलेच तर ऐलतीरी पैलतीरावरून कसे येणार? असल्या अनेक शंकांनी आम्हांला घेरलेलं. त्यामुळं आमच्या पोरसवदा मनात कोडं बसलेलं. बिनउत्तरासारखं आडवंतिडवं बोलणं करीत हं! आता? यातून काय तोड!

आमची शक्कल काढावी म्हटलं. मला एकदम एक गोष्ट सुचली, “ दादा, नाव काढा ती. फुटकी असू दे. ” त्यावर त्यानं “ शहाणीच आहेस ! ” म्हणून माझा कान गच्चम् पिरगळला. तरीदेखील मी पुन्हा बडबडले, “ फुटक्या नावेत येणारं पाणी बारक्या बादलीनं शेंदून काढीत फेकून दीन मी पाहिजे तर ! ’ तशी ही पोरं चमकली. त्यांना एकदम माझी ही अक्कल पसंत पडली; पण मी मुलगी म्हणून ऐलतीरावर नुसती उभी रहायची न् ह्या तिघांनी जायचं असं ठरलं. माझी ना नव्हती. मी बराय् म्हटलं आणि अगदी उजाडत आम्ही निघायचा बेत केला. शाळेत कळवलं नाही, की गुरुजींना पण सांगितलं नाही.

झालं. अख्खी रात्र उभ्या पावसानं गाव झोडपला आणि आम्ही घरात होते नव्हते तेवढे दोरखंड गोळा करीत एकाला एक जोडून सांधून घेतले. नाव फुटकी न् दोर तुटका ! झकास गोष्ट जमली.

होता होता दहीभाकरीची न्याहरी करून आम्ही निघालो. अंगावर पोत्यांची खोळ घेतली. घरातल्यांना वाटलं की, शाळेतच जातोय. म्हणून चटकन् निघता आलं. तर एकदा शाळेत जाऊन यायचा बेत केला. पण मग तिथं कुणी नकार-घंटा वाजवायला नको म्हणून तशीच नदीकडे धूम ठोकली.

तिथं जाऊन बघतोय तर नदीला खूप पाणी आलेलं. महापूरच जसा ! आता काय करायचं ! आमची मनं दुचीत झाली; पण दादा म्हणाला, “ आपण देवाचं नाव घेऊन नदी पार करून जाऊ या. ” पाणी तोवर उतरेल न् मग नाव आणू या. ” त्यावर सगळेजण ‘ बरं ’ म्हणालो. सर्वांना पट्टीचं पोहता येत होतं. तर चांगले कपडे माझ्याजवळ देऊन आणि पोत्याची खोळ माझ्या अंगावर टाकून हे तिघे नदीत पडले. तशी माझा जीव उडून गेला. मी नदीला नमस्कार घातला, “ आई, लोकमाते, संभाळून घे. आमच्या कल्पनेला उदंड आयुष्य दे. ”

इकडे तोवर सपासप पाणी कापीत ही पोरं खायल्या अंगानं पोहत चालली होती. पैलतीर दिसत होतं. चिक्कार पाऊस होता तरी ते नजरेत येत होतं !.... मी डोळे फाडून फाडून बघत होते. पाऊस अंगावर रपरपत होता. कुणीतरी फेकलेली दगडं अंगावर येऊन बसावीत असा ! पण कळ काढणं भाग होतं.

तेवढ्यात गुरुजी आले. मला बघून त्यांनी विचारलं, “ इथं कशाला आलीस एकटी ? ” पण मी एकदम खरं बोललेच नाही. ‘ उगीच आले पाणी बघायला ’ असं दिलं ठोकून.

" तुझा दादा कुठाय ? " गुरुजींनी विचारलं. त्यांच्या हातात छत्री होती. पण वाऱ्यानं ती हेलकावे खात होती. म्हणताना मी त्यांना पोत्याची एक खोळ दिली आणि काही बोलणार, तर गुरुजीच आणखी म्हणाले, " रामजीला न् विठूला बोलावून आण जा ! " तरीही मी आपली गप्पच. खरं सांगितलं तर ते रागावतील या धास्तीनं मी दुसराच विषय काढला, " पाऊस असा एकदमच कसा आला गुरुजी ? "

" असा पाऊस मी पावसाळ्यात पण पाहिला नाही. फारच झडली मुसळ-धार एकाएकी. "

" सभा कशी होणार मग गुरुजी आता ? "

" पंचाईतच आहे. "

" कशाची ? "

" पावणे कसे येतील ? "

" त्याची नको काळजी. देव आणील त्यांना. "

" कोण म्हणतं ? "

" मी ! "

" वेडी आहेस ! पाऊस किती आहे ! नदी तुडुंब भरून चाललीय. "

" चालू दे... पावणे नदीच्या पाण्यावर चालून येतील !.... जादूगार आणील त्यांना. मग नदीचा नक्षा आपोआप उतरेल. फुगवटा जाईल पाण्याचा. पावसाचं पाखरू मग भुर्रकन उडून जाईल ! "

बोलता बोलता मी थांबले. पोरं एव्हांना बरीच लांब गेली होती न् पैल-तीरावर माणसं दिसत होती. बहुतेक पावणेच आले असावेत. म्हणून गोष्टीतल्या गत बोलतेल्या मी एकदम गुरुजींना सांगितलं, " ते बघा पावणे आलेत ! " तशी त्यांनी मला आणखी एकदा खुळ्यात काढलं. मग मी गप्प बसले. समोर बघू लागले. श्वास रोखून. डोळे तारवटून.

होता होता पोरं पैलतीराला पोचली. तशी मी एकदम नाचत टाळ्या वाजवल्या. त्यामुळं गुरुजींनी मला पुन्हा एकदा वेडी म्हटलं. म्हणोत बापडे. माझ्या मनातलं त्यांना ठाऊक नव्हतं. तर त्यातलं त्यांना काय कळावं ? मी आपलीच समजूत घातली न् समोर बघत राहिले. छत्री घेतलेली माणसं पांढुरकी

दिसत होती. पोरं चिंब भिजून बोलतेली दिसत होती. मला दिसत होतं हे. मग खरं खोटं हरी जाणे. मी आपल्या नजरेवर विश्वास ठेवून बघत होते.


हळूहळू लांबच्या कोपऱ्यावर एक नाव पाण्यात फेकलेली दिसली. त्यात ही माणसं चढली आणि नाव चालू झाली .... शप्पथ ! .... मी हे बघितलं मात्र न् सर्रदिशी माझ्या अंगावर काटा चढला...

ती नाव फुटकी होती न् ह्या पोरांनी नेलेले दोर तुटके होते ! अरे देवा ! न जाणो वेळ चालून आली तर ?.... पाण्याला ओढ भयंकर होती आणि आधीच भिजून चिंब झालेल्या माझे दात भीतीनं वाजत होते. म्हणताना उरात उठणाऱ्या कळेला मी हातानं दडपीत गप्प केली न् घाबरू नको म्हणून स्वतः-वरच ओरडले. तशी गुरुजी दचकले. म्हणाले, "काय झालं ?"

आता मात्र मी खरी गोष्ट त्यांच्या कानावर घातली. त्यासरशी त्यांची पण छाती दडपून गेली आणि त्यांनी मला बखोटीला धरीत खडसावून विचारलं, "सांगितलंस ते खरं काय ?" तशी मी 'होय' म्हणाले आणि टाचा उंच करीत समोर बघत राहिले. तर त्या वेळी मी आपल्याच नाकापुढं हात धरून श्वास चालतोय का नाही ते पाहिलं आणि पावसासकट नदीला म्हटलं कसं, "आता दमछाट होऊ दे. उतावळेपणा सरू दे. पावणे येणार आहेत. सभा बसणार आहे. आमच्या पोरांची इच्छा कडेला जाऊ दे." त्यासरशी कसा कोण जाणे, पाऊस पावणा जरा दमधीर झाल्यागत वाटला आणि चहाच्या उकळत्या पाण्यागत उसळत निघालेली नदी पण जरा थकलेली वाटली. खरंच ! मग मला जरा बरं वाटलं. मी पुन्हा पुटपुटले, "विठू, फुटक्या नावेत शिरणारं पाणी भरू दे. रामजी तुटके दोर सुटले तर सावरू दे आणि आमचा दादा त्या दोरानं नावेला ओढीत आणताना त्याच्या दंडबाह्या लोखंडाच्या होऊ देत देवा !" आणि डोळे मिटून घेतले. नाव उलटली तर बघणंच नको ते या धास्तीनं मी डोळे मिटून घेतले; पण मनात कल्लोळ माजून गेला. एखाद्या राक्षसानं येऊन ह्या नदीला चुटकीसरशी पिऊन तरी टाकावी, नाही तर जादूच्या घोड्यावर बसून हे सारे सुखरूप येत हिचा नक्षा तरी उतरावा, असं सारखं वाटायला लागलं. म्हणून मी आसपासच्या झाडाझुडपांना पुढं होत नदीला वर अडवून टाका म्हणाले आणि पायाखालच्या जमिनीला नदीला गडप करून टाकायची गळ घातली. देवाशपथ ! पण तेवढ्यावरही भागेना. म्हणताना दात-ओठ खात अंगावर येतेल्या पावसावर

डोळे वटारले आणि नदीला तिच्या आईबाची शपथ घालीत, सुटलीच म्हणणार नाही थांबल्याशिवाय, असं सांगून टाकलं. माझ्या जिवाची उलाघाल उडून गेली. मन गुदमरून गेलं आणि नजर पाणावली. माझा सोन्यासारखा कोवळा दादा मरायला नको असं वाटलं. आणि नाजूक विठूच्या जोडीला कणखर बांध्याचा असलेला रामजी पण मरू नये ही माझी भावना झाली. पाऊसच तसा अचाट होता आणि नजर ठरत नव्हती असा नदीनंही सुंसाटा मारला होता !

माझ्यापेक्षा गुरुजीच घाबरून गेले होते. त्यामुळं माझा धीर मला आवरता येत नव्हता. म्हणून मी पायाखालचे खडे उचलून ते भिरीरा नदीला मारले आणिक पुन्हा ओरडले, " माझ्या गळ्याची शपथ आहे पोरांच्या मधी आलीस तर ! "



तेवढ्यात पात्राच्या मध्यावर नावेसारखं काही तरी येताना दिसलं. म्हणताना माझा जीव हरखून गेला. मी गुरुजींना म्हटलं, " ते बघा पावणे आले· नक्की आले. " पण अजूनही गुरुजींचं दणाणून गेलेलं धाबं ठिकाणावर बसायला तयार नव्हतं. त्यांचा एकच ठेका चालू होता, " सभा आजची उद्या होईल. पण पोरं सुखरूप येऊ देत. " म्हणून मग मी बोललेच नाही. मारुतीगत सूर्यावर झेप घे म्हणून मी माझ्या मनाला सांगून टाकलं आणि मेघरायांना आभाळातला मंडप उठवा म्हटलं. तशी बोलाफुलाला गाठ पडावी त्याप्रमाणं आभाळ निवळलं आणि पावसानं दम टाकला.

त्यानंतर बराच वेळ असातसाच आला आणि गेलाही. पोहोणाऱ्या मुलांची

डोकी फर्लांगावर दिसल्यावर आणि त्यांच्या मागोमाग नाव येतेली पाहिल्यावर मी शाबासकीचा मोठ्यानं हाकारा घातला आणि पोलक्याच्या खिशात भिजून गेलेली खडीसाखर काढून ती दाही दिशांना ओवाळून टाकली.

घटकाभरात पोरं आली न् पावणे आले. गुरुजींचा जीव एवढा झाला. माझ्या दादाला कडकडून मिठी मारीत त्यांनी आपल्या अश्रूंनी त्याला न्हाऊ घातलं. तेवढ्यात पावणे खाली उतरून आले. भिजून चिंब झालेवते तरी त्यांनी ओल्या कपड्यातील आपल्याला सावरीत पुढे येऊन सांगितलं, "शाबास! शाबास या मुलांची! फुटक्या नावेतलं पाणी काढून यांनी फेकलंच; पण तुटक्या दोरानं नाव ओढीत आणली!....असली अपूर्वाई आम्ही बापजन्मी पाहिली नाही. पुढंही पाहायला मिळायची नाही.... शाबास! शाबास!! तुम्ही नशीबवान म्हणूनच असली मुलं विद्यार्थी म्हणून तुम्हाला मिळाली.....प्रत्येक क्षणाचं आव्हान स्वीकारलं त्यांनी. पावसाला लाजवलं, नदीला शरमिंदी केली....झालं. शाळेचं उद्‌घाटन झालं. . . . गावोगाव डंका पिटवा...."

त्या वेळी आमचे सगळ्यांचे चेहरे हसले आणि समाधानानं आमची दृष्ट काढून टाकली. आम्ही आमची शर्त जिंकली. आता सभा नक्की होणार....नक्की होणार........देवा, तू पण यायचंस हं सभेला! शपथ आहे बघ नाही आलास तर? आमच्याशी गाठ आहे. वाजंत्री तुझ्यांनी यायचं हं देवाधिदेवा!........नाहीतर ही नाव तुम्हांला पण घ्यायला येऊ दे का? म्हणत असाल तर हिला घेऊन या पावलीच आम्ही येतो....शप्पथ!....

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे ... शाखा
अनुक्रम...६८२०५.. दि...
क्रमांक....३३७...नोंद दि...

# फूल नाही फुलाची पाकळी

*त्या दिवशी* पावसानं एकाएकी भलता जोर केला आणि म्हणून रोजच्या वेळापेक्षा तासभर उशिरानं दख्खनची राणी पुण्याला पोचली. त्यामुळं गाडी यायच्या आधीच नेहमीच्या वेळेला स्टेशनवर येऊन बसलेली मी पार गारठून गेले. वाऱ्याचा जोर होता आणि पाऊस मुसंडी मारून स्टेशनात घुसत होता. तशी आधीच काकडून गेलेली मी आणखीनच हातपाय पोटाशी घेत बसून राहिले. भोवती पोरांची गर्दी. त्यांच्या हातांतील हारगुच्छांनी सगळं आवार पिवळं-तांबडं झालेलं. त्यांच्या आरोळ्यांनी स्टेशन दणाणून गेलेलं आणि गुरुजी फार दिवसांनी गावाहून येणार म्हणून मी आमच्या बागेतील एक टपोरी गुलाबाची कळी हातात घेऊन गाडी यायची होती त्या वाटेकडे आपली नजर लावून बसलेली.

तेवढ्यात कोणी तरी ओरडलं, "दिवा चकाकला. गाडी आली !" तशी मी सावरून उठले. मला न दिसलेल्या त्या दिव्याकडे बघून त्याच्या उजेडात काय काय बघायला मिळेल याची बेरीज करू लागले. तशी काय झालं की–

...'एक असते परी. तिच्या हातात चांदोबाचा दिवा. अंगावर चांदण्यांचे बुंदके असलेली साडी. नजरेत मोठा आकाशदिवा....अवतीभोवती पाजळलेली दीपमाळ. समोर चंद्रज्योतींची कारंजी उसळलेली....तर अशा उजेडात उगवती नाजूक किरणं फेकीत येतेली....परीनं तिला नमस्कार केला. त्यासरशी मुलांची बसलेली सभा एकदम उठली. गरजली. चॉकोलेटची झाडं नाचत पुढं आली. त्यावर मुलं तुटून पडली. परीनं खाऊचे पुडे उघडले. पहिल्यांदा आले लाडवांचे डोंगर. मग आली चकल्यांची दांडगी चवड. मग आल्या फळांच्या करंड्या. मग आली शेवचिवड्यांची पोती. मग आले हरतऱ्हेच्या गोळ्यांचे डबे. सर्वांनी धरला फेर. ती लागली नाचायला. पोरांच्यापुढं जसा काय खाऊचा पाऊसच पडला हं !' ...

हा चमत्कार माझ्या मनात घोळला. जीभ पाणावली. मन हरखून गेलं आणि आता गुरुजी पिशवी भरून खाऊ घेऊन येतील असा एक बेत पक्का झाला. त्यासरशी एकदम बरं वाटलं आणि भुकेची वेळ गेल्यामुळं हलक्या झालेल्या पोटाची तहानभूक पार हरपून गेली. म्हणताना आम्ही मुलींनी नक्षी काढून दिलेल्या पिशवीला मी प्रार्थना केली की, 'बये, पोट फुटस्तोवर भरून ये तू ! इतकी फूग की, गुरुजींचा हात ओझ्यानं लवू दे.'

तितक्यात काय झालं की, गुरुजींच्यावरोबर सहलीला जायचा विचार मनात डोकावला. तशी मनानं झटक्यासरशी उसळी मारली आणि लांबच्या गावाला मला नेऊन सोडलं. म्हणताना बघता बघता दाट जंगल नजरेत आलं. तिथल्या फुलांचे ताटवे डोळ्यांत भरले. त्या फुलांच्या सुगंधी दरवळीनं मनाचा शीण गेला. तिथल्या फेसाळलेल्या न् डोंगरावरून झेपावलेल्या खळाळत्या पाण्याला बघून मन हरखून गेलं. शेजारच्या ओढ्यातील धबधब्याखाली मी केव्हाच जाऊन बसले. डोईवर पडलेल्या पाण्यानं आंघोळ केली. ओढ्याच्या पाण्यात पाय सोडले. हातानं पाणी उडवलं. खूपखूप मज्जा आली. तेवढ्यात झिरीमिरी पाऊस आला. पाठोपाठ इंद्रधनुष्य आलं. त्यावर बसून मी आकाशात फेरफटका मारला. एवढी उंच उंच गेले की, झाडाची फुलं वेचावीत त्याप्रमाणं मी आपल्या हातानं चांदण्या वेचल्या! शप्पथ!!.... तर त्या नादात असताना वाऱ्यानं घंटा वाजवली आणि डोंगरांनी रांगा केल्या तशी आम्ही पण इकडे तिकडे मिरवत होतो ते एकत्र आलो.... आणि आता डबे सोडून जेवायला बसणार इतक्यात खरंच गाडीची शिट्टी वाजली! त्यासरशी सरसावून मी पुढं झाले आणि सहलीला जाऊयाच म्हणून गुरुजींना आल्या आल्या गळ घालायची ठरवून उभी राहिले.

दख्खनच्या राणीचा दिवा चकाकला. पुढं पुढं यायला लागला. गाडीचा झुक्झुक्ता आवाज येत चालला म्हणताना सगळी पोरं एकदम पुढं झाली. टाळ्या वाजवीत तोंडानं शिट्ट्या मारायला लागली. तशी दुसऱ्या गुरुजींनी त्यांना एकदम मागं व्हा म्हटलं. गाडीला अंग चिकटेल म्हणून भीती घातली. त्यासरशी अवखळपणानं मुलांनी घेतलेली पुढची झेप मागं खेचली न् तेवढ्यात गाडी आली पण!

झालं. स्टेशनात गाडी घुसली नाही तोच पोरांनी गुरुजींच्या नावाचा जय-जयकार करीत ती नगरी दुमदुमून सोडली. मी हळूच पुढं झाले. तशी कुणी म्हटलं गुरुजी या डब्यात आहेत, कुणी बोललं पलीकडच्या डब्यात आहेत. म्हणताना पोरांचा लोंढा इकडे तिकडे निम्मा निम्मा पांगला आणि एकदम डाव्या अंगाला घुसला. मी पण पाठोपाठ पळाले.

त्या वेळी गुरुजी बसले होते तो डबा पटकन उघडूं दे असं वाटलं आणि उगाचच घाम फुटला. एखाद्या गोष्टीतील राक्षसानं माणसाला आवळून घेवावं नाही तर आत ढकलून दाराला साखळदंडासकट गाडीच्या चाकागत भलं दांडगं

कुरूप ठोकावं तसं काही घडू नये म्हणून जिवाची तगमग झाली. त्यासरशी मी एकदम किंचाळले तर एकदम डब्याचं दार उघडून गुरुजी गाडीतून बाहेर आले न् जीव खाली पडला. खरंच !

गाडीच्या डब्याचं टोपण लाडवाच्या डब्याच्या टोपणासारखं उघडेल वाटलं होतं; पण सर्कशीतल्या पिंजऱ्याप्रमाणं बारकंसं दारच तेवढं उघडलं गेलं. त्यासरशी गुरुजींना बघून मुलांनी जोरानं शिट्ट्या मारल्या आणि त्यांच्याभोवती गराडा घातला. गुरुजी हसलेले बघून एकदम बरं वाटलं आणि लांबूनच एकटक बघत राहिले. मनात आलं की, ह्यांच्या स्वप्नात गंमत घडली म्हणून ते हसले असावेत. नाही तर एकदम पंख न लावता त्यांना आभाळात उडता आलं असेल म्हणूनच त्यांचा चेहरा एवढा खुललाय हं !

मी आपल्याशीच बोलत उभी राहिले. तेवढ्यात फुलांचे हार दरवळले आणि गुरुजी पुढं पुढं यायला लागले. बघतेय तर त्यांच्या हातात एक पुस्तक हं ! तर ते बघून मी एकदम मिटक्या मारल्या आणि आता गुरुजी झक्कासपैकी गोष्ट घेऊन आले असावेत या कल्पनेनंच सुखावले.

अग बाई ! ह्या पुस्तकात सोन्याच्या दोरीला मोत्यांचा पाळणा असेल का ?....आणिक हिऱ्यामाणकांच्या अब्दागिरीखाली खेळतेली राजाची लेक मला भेटेल का ?....खरंच, ह्यात पोरं पोटात घेऊन उशा घेतेला चेंडू असेल, का मुलांचा पाय लागताच समुद्रात सूंबाल्या ठोकणारी नाव असेल ?....येऽऽ नाही तर रॉकेट-मधे बसून चंद्रावर नेणारा जादूगार असेल का गडे या पुस्तकात ?....खरंच, काय काय असेल बरं ?

मला मेलीला काहीच सुचेना. म्हणताना कारण नसतानाच भुललेल्या जिवाला मुठीत घेऊन मी पुढं झाले. कारण तेवढ्यात गुरुजी माझ्या समोर येऊन ठेपले होते आणि आता ते जिना चढून जायच्या बेतात दिसत होते. भोवती मुलांच्या माकडउड्या चालल्या होत्या आणि त्यांना काही विचारीत कुणाचं नाक, तर कुणाचा गाल पिरगाळीत गमतीनं गुरुजी काही सांगत होते. तशी झटक्यानं मी पुढं जाऊ लागले तर हातात ती गुलाबाची कळी कुठाय ? म्हणजे ? आता काय देऊ मी ? मला दरदरून घाम सुटला आणि मी अगदीच हिरमुसून गेले. मोकळ्या हातानं कसा नमस्कार करायचा ? मला कोडं पडलं. मी कावरीबावरी झाले. ते बघून मुलं हसली. मला एकदम रडू कोसळलं न् मी गुरुजींच्या पायांवर

डोकं ठेवीत पुटपुटले, " उद्या आणीन फुलं. " त्यासरशी गुरुजींच्या पायांवर माझे



अश्रू ओघळले आणि त्यांनी मला पोटाशी धरीत पाठीवरून हात फिरवला. तशी एवढं बरं वाटलं की, विचारू नये.

पण तेवढ्यात एक पोरगा कुचकुचला, " फुलं नाही ना आणली ? खोटार्डी फोटार्डी ! " आणि त्यावर मी काही बोलणार तर गुरुजींनीच माझ्या गळ्यात आपल्या गळ्यातील हार काढून घातला आणि माझा गालगुच्चा घेऊन ते पुढं सरकले. त्यांच्या मागोमाग मुलांचा चोखामेळा गेला आणि मी एकलीच मागं उरले.

हळूहळू सगळी माणसं निघून गेली आणि मी पण हत्तीच्या पायानं चालले. गळ्यात हार तसाच हं ! आपली ऐटीत निघाले. मला एकटीलाच हार मिळाला होता हीच तालेवारी मला पुरेशी होती. म्हणून मी त्या हारावरून हात फिरवला तशी एक शेवंतीची पाकळी खाली घसरली. म्हणाली कशी, " तू शहाणी आहेस. पहिला नंबर आणतेस. म्हणून तुला हार. तर यातली एकेक पाकळी रोज घेऊन अभ्यास कर. पोत्यानं मार्क मिळतील. पहिल्या नंबरच्या वर येशील ! सगळी शाळा नावाजेल. बक्षिसं मिळतील. "

हे ऐकून माझं मन गहिवरलं आणि मी ती पाकळी उचलून पळत सुटले. धावत धावत स्टेशनच्या दाराशी आले. बघतेय तर गुरुजी न् पोरं पावसातून मजेत चाललेली. पायीपायीच ! छत्रीबित्री अं हं ! म्हणताना मग मी पण एकदम पळत गेले आणि फर्लांगावर गुरुजींना गाठून त्यांच्या हातात ती पाकळी देत म्हटलं कसं, " घ्या. फूल नाही पण फुलाची पाकळी. परीक्षेत पहिल्या नंबरच्या वर नंबर येईल ! आधी तुमचा येऊ दे मग आमचा ! " त्यासरशी पोरांनी टाळ्यांचा कडकडाट केला आणि आभाळात लवतेल्या विजेला बघून गुरुजींनी ती पाकळी सर्वांच्या स्वाधीन करीत म्हटलं, " तुमचं कवतीक तेच माझंही ! " आणि मग हसत खेळत आम्ही कधी घरी परतलो ते एकटा हरी जाणे ! पाऊस येतच होता. तरीही आम्ही काही विचारीत होतो. गुरुजी बोलत होते. आनंद नाचत होता. सुट्टी संपली होती आणि पुन्हा आम्ही आपल्या जगात येऊन पोचलो होतो....त्यामुळं कुणालाच कशाचं भान राहिलं नव्हतं !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे . . . . . . . . . . . ता.
अनुक्रम . . . . . . . . दि . . . . . .
क्रमांक . . . . . . . . . . . . . . . . . नोंद दि . . . . . . . . . . . . . . .

# १०. आज देवाला उजाळलं

दिवसभर आईच्या मागं फिरताना मी खुशीत असायची. खायला खिशात नसलं, नेसायला अंगभर झगा नसला आणि तेलपाणी वेळेवर नसल्यामुळं केसांची बुरखुलं तोंडावर घुटमळत असली तरी मला कशाची म्हणून कधी फिकीर वाटायची नाही. आई बरोबर आहे यातच दुनियेतलं सारं सुख गोळा झालंय या भावनेनं मी तिच्यामागून दिवसभर हुंदडायची; पण एखादे वेळी " मी मागनं यीन. तूं म्होरं हो. " असं सांगून तिनं मला खोलीकडं पिटाळलं की, हसता हसता मला रडू यायचं. ' आमी न्हाई जाऽऽअशानं ' करीत मी तिथंच घुटमळत तिच्या तोंडाकडं बघायची; पण आज तिनं डोळे वटारून माझ्या पाठीत धपाटा घातल्यानं मी भोकाड पसरीतच तिला सोडून खोलीच्या वाटेला लागलेवते.

डाव्या हाताच्या दंडावरच्या फाटक्या पोलक्यानं डोळ्यांतील पाणी टिपीत आणि मुसमुसत मी पावलं उचलीत होते. संध्याकाळचा वारा जमिनीवर पाय ठरू देत नव्हता. त्यामुळं माझी पावलं भराभर उचलली जात होती. पण त्या दर पावलागणिक भीतीनं माझ्या काळजात धस्स होत होतं. खोलीकडे जायला जीव घेत नव्हता. डोळे मिटून रस्त्यातच फतकल मारून आई येस्तोवर बसावं असं मनानं घेतलंवतं; पण कशी कुणाला माहीत, वाऱ्यानं उडून गेले तर तळ्यातल्या पाण्यात पडून मरेन या धास्तीनं माझी छाती दडपलीवती आणि मी भराभर पुढं निघालेवते.

पण आज खोलीजवळ येतानाच अंधार पडू लागल्यामुळं माझे पाय अड-खळले. आई आज लौकर येणार नव्हती. नाही तर ती येईपर्यंत मी दारातच ठिय्या मारला असता; पण बाहेर बसायलाही भीती वाटू लागली म्हणून मी कशी-बशी खोलीच्या तोंडाशी आले नि मनात आलं, आईनं काम करताना पाठीला बांधलेली छोटी चिंगी तिच्या डोक्यावरचा दगड मागच्या मागं पडून मेलीबिली तर? तर बाई हे मनात येताच एवढी भीती वाटली की, सूंऽऽबाल्या ठोकून आईला गाठावं म्हणून मी माझा पाय देखील उचलला. पण तेवढ्यात काय झालं कोण जाणे, एकदम आमच्या खोपीत दिवा दिसला. म्हणून मी दचकून मान मागं फिरवली. खरंच कुणी तरी मोठ्ठा दिवा आमच्या अंधाऱ्या खोलीत लावला होता.

" कोण बरं आलं असेल दिवा घेऊन? " मी माइया तोंडावरची केसांची

बुरकुलं हलक्या हातानं मागं ओढीत कानाजवळ खुपसून दिली आणि हळूच आत डोकावले; पण आत कुणीच दिसेना. पुन्हा एकदा खोलीच्या दाराला गच्च धरून मी आपलं अंग आत लोटीत बघू लागले तरी आपला शुकशुकाटच ! ‘ अग बाई ! भूतवीत तर नसेल ? ’ माझ्या अंगाचा थरकाप उडून गेला. बोबडी वळली. मी धाड्दिशी खोलीच्या तट्ट्यावर कोलमडले आणि किंचित् कर् कर् कर् असा आवाज झाला....कुणी तरी चटकन् मला उचलून त्यावेळी आभाळात वर फेकीत असल्याचा भास होताच मी गपकन् डोळे मिटीत ओरडले, “ आई गऽऽऽ”

“ ....अरे, घाबरलीस तू ?....” आईच्या ऐवजी घटकाभरानं कुणी तरी असं मला विचारलं आणि माझ्या केसांवरून हात फिरवला. पण त्यामुळं बरं वाटायच्या ऐवजी मी जास्तच घाबरून गेले. कुणी तरी अनोळखी माणूस माझ्याशी बोलत होतं आणि त्याचा आवाजही माझ्या ऐकण्यातला नव्हता. म्हणून मी माझ्या झबल्याच्या लत्याबत्या झाल्यावत्या तरी त्याचा सोगा एकजागी गोळ करून तोंडावर गच्च दाबून धरला आणि पुन्हा मोठ्यानं किंचाळले, “ आईऽऽ मेले गऽऽऽ ” माझी समजूत भूतच आलं आहे आणि आता ते मला खाऊन टाकणार !

पण झालं सारं निराळंच. हळूच मला कुणी तरी अलगद उचलली आणि तट्ट्यामुळं ओरबडलेल्या माझ्या अंगावर मायेनं हात फिरवला. त्या मऊमऊ हातावर मीही माझा हात ठेवला. तशी बांगड्या हाताला लागल्या. वाटलं आईच आली म्हणून ! “ आलीस तू , बरं झालं बघ ! ” असं पुटपुटत मी खुदकन् हसले नि डोळे उघडले; पण पहाते तो आईच्या ऐवजी कुणी गोरी गोरी मुलगी मला बघून हसत होती. तिनं मला आपल्या पोटाशी धरलं होतं !....

एवढी गोरी मुलगी आणि तिच्या अंगावरचे एवढे चकचकीत लखलखीत, दागिने व परकर चोळी मी कधी बघितली नसल्यामुळं माझ्या तोंडानं ‘ आ ’ वासला. ही काय भानगड मला कळेना. म्हणून दोन्ही हातांनी आपलं डोकं गच्च दाबून धरीत आईकडे पळावं म्हणून मी हालचाल केली तो ती मुलगी म्हणते कशी, “ वा ! रोज रोज देवाची पूजा करताना म्हणायचीस की तुझी मुलगी खेळायला पाठव आणि आज आले तर बोलत पण नाहीस ! असं नको करू; चल देवाकडे नेतें तुला. ”

“ चल तर चल ! ” असं म्हणून मी तिच्याबरोबर निघणार; पण ‘ आई

काय म्हणेल ?' असं मनात येताच मी तिला म्हटलं, "आईला विचारून येऊ का ?"

"हं ! यात काय आईला विचारायचं ? आत्ता येऊ आपण ! चल." तिनं मला हात धरून ओढली नि मीही आपोआप तिच्या मागोमाग निघाले.



आम्ही दोघी अगोदर आमच्या पायाखालच्या जमिनीवरून चालले होतो. पण पायाला रोजच्यासारखे खडे बोचत नव्हते ! उलट समोरच्या रस्त्यावर उजेडाचा झोत येत होता; आणि सारे खडे भराभर बाजूला होऊन मऊमऊ माती पसरली जात होती....

चालता चालता तलावाच्यासाठी उंच उंच केलेल्या भिंतीला सोडून ती घसरणीला लागली.

आणि पाण्यात पाय ठेवले तरी मेले ते बुडत नव्हते की भिजतही नव्हते ! रस्त्यानं चालावं तशा आम्ही पाण्यावरही चालत होतो !....माझ्या मनात आलं, आईला बरोबर आणली असती तर किती मजा झाली असती. पायाला काटेकुटे बोचून, खडे लागून कधीकधी रक्त यायचं तिला पण या रस्त्यावर चालायला नसतं का आवडलं ?....पण आईचा विचार करायला सवड होती कुठं मला ? तलावातल्या पाण्यावर तरंगणाऱ्या लाटांनी माझ्या पायांत पैंजण बांधले ! छुम् छुम् करू

लागले माझे पाय !....तो आवाज ऐकताच त्या मुलीला मी विचारलं, " नाव काय ग तुझं ?...."

" राणी !...." तिनं गोडसं हसून मान वळवली आणि विचारलं, " का ? "

" नाही ग ! म्हटलं हाक मारायला बरं. "

" असं होय ?....तुला खेळायला आवडतं ? "

" फार. पण कुणी नसतंच खेळायला. गजगे आवडतात तुला ? "

" मला नाचायला आवडतं; पण तू म्हणशील तर खेळेन की गजगेही ! "

" चल तर मग डाव मांडू या. " असं पुटपुटत मी चालता चालता एकदम बैठक मारली. पण माझ्या भोवताली पाणीच पाणी बघून मी घाबरले नि राणीचा हात धरीत घाईघाईनं म्हणाले, " नको बाई नाही तर. "

" का ग ? " राणीनं आपल्या ओठाला व कपाळाला मुरड घातली आणि टाळ्या वाजवल्या. मला वाटलं ती आणखी कुणाला बोलावतेय खेळायला. पण पहाते तो आभाळातल्या चांदण्या नऊखऊच्या बेतानं टुणुटुणू उड्या मारीत माझ्या हातात पडल्या !

डाव्या हाताची करंगळी दाताखाली दाबीत न् डोळे मोठाले करीत मी समोर पाहिलं तो गजग्यांचा डाव टाकावा तशा आमच्या पुढं चांदण्या गपचुप बसल्य होत्या ! त्यातली एकही चांदणी उचलून घेऊन डावाला सुरुवात करायला मन घेईनाच ! मी बापडी नुसती टकमका बघतच राहिले. पण राणीनं त्यातलीच एक चांदणी उचलून माझ्या हातात देत म्हटलं, " हं, घे हा खडा नि कर सुरू डाव ! "

" नको बाई ! " साधी चिमणीदेखील माझ्या खोलीत नव्हती तिथं चांदणीचा लखलखाट माझ्या डोळ्यांत मावेना. मी मागं सरकले; पण किंचित पाण्यात झोक जातो आहे असं वाटताच मी दचकले नि राणीला मिठी मारीत त्या तिथल्या लांबच्या तिरप्या भिंतीपलीकडच्या जागेकडे बोट करीत पुटपुटले, " इथं फार वाईट असतं म्हणतात ! मागच्या दुष्काळात माणसं पटापट मेली ती या मातीच्या खड्ड्यांत गाडली !....आता बाई तसं व्हायला. त्या माणसांत माझी आई नि चिंगी आहे !....तेवढी ती जागा........ते ते खाचखळगे बुजवून टाकायला सांग देवाला !....त्याशिवाय नाही खेळत मी...."

" हात कशी एवढंच ना ? ते बघ बुजले ते खळगे !.... " राणीनं भुर्रदिशी उडायला सुरुवात करीत मलाही वर उचलली. आम्ही दोघी रस्त्यानं मोटर पळावी तशी आभाळात वरवर निघालो. पाखरांसारखे राणीचे पंख हलू लागले....एका हातानं फक्त तिनं मला धरलेली. त्यामुळं माझा जीव घटकेघटकेला घाबरा होत चाललेला. वाटलं तिच्या हातातून निसटून पडलेबिडले तर ?

पण तसं काही न होताच खेळातल्या भावलीच्या अंगावर घातलेल्या मण्यां-सारखी खालची बारीक दिसणारी दुनिया बघत बघत मी राणीच्या घराजवळ केव्हा आले कळलंदेखील नाही ! आमच्या गावच्या रामाच्या देवळासारख्या तिच्या घराला पायऱ्या नव्हत्या. ढगांची शिडी तिथं लावलेली होती. कापसासारख्या पांढऱ्या लख्ख ढगांची एकेक पायरी चढून मी राणीच्या मागोमाग निघाले....

" हे बघ माझे सोबती. यांच्याशी मी रोज खेळते. " आपल्या अंगणातील मोरांचा नाच, कोकिळेचं गाणं, चिमण्यांची चिवचिव, पोपटाचं विठू विठू, पाण-कोंबड्याचं उड्या मारणं वगैरेकडे माझं मन वळवीत राणीनं माझ्या हाताला धरून आपल्या घरात नेली. घटकाभर वाटलं, खेळावं या पक्ष्यांच्या मेळाव्यात बसून; पण जीव धजेना. सारे मेले चकचकीत दिसत होते. प्रत्येकाचं अंग जरीबुट्टीनं मढवलेलं. प्रत्येकाचे डोळे हिऱ्यामाणकानं सजवलेले. सारंच अनोळखी. मग भांबावून जाईना तर काय होईल ?

" तुला काय काय खेळ येतो ग ? " राणीनं आपल्या दिव्यांच्या पलंगावर बसवीत मला प्रश्न केला. मी आपली दिव्यांकडेच बघत होते. भाजेलबिजेल म्हणून अंग चोरूनच मी बसलेली. माझं सारं लक्ष त्या दिव्यांनीच वेधलेलं ! राणीचं बोलणं मी ऐकलं पण मला उमजलं नाही. त्यामुळं तिनं पलंगावरून उठून खिडकीशी नेत मला तोच प्रश्न पुन्हा विचारला. आणि मी पण मग " पुष्कळ येतं की ! " असं थोड्या फुशारकीनंच बोलून गेले.

राणीच्या इच्छेखातर मी तिला गौरी मांडून दाखविल्या. आभाळातल्या दोन देखण्या पोरींनाच नटवून-सजवून घेतलं आणि त्या गप्प उभ्या राहिल्या. नुसते त्यांचे डोळे फिरायचे. बाकी आपल्या गौरीसारख्या चूपचाप ! मी जेव्हा त्यांच्या भोवती आरती ओवाळली तेव्हा खुद्द चांदोबा देखील आमच्या निरांजनात येऊन बसला तर !....सारा उजेडच उजेड !....

दिवाळीतल्या शेणाच्या गौळणी मी राणीला घालून दाखवू लागले तशी

एकेक डोंगर, एकेक नदी, एकेक फूलझाड नाचत खेळत धावून येऊ लागली !.... जत्रेत एक पैशाला नाही तर दोन पैशाला बर्फाची कांडी खायला घ्यावी तसा बर्फाचा डोंगर, हाराला जीग माखावा तशी फुलंच फुलं आणि नजर ठरू नये अशी धावणारी नदी बघून मी इतकी भांबावून गेले की विचारू नका !....ते सारं बाजूला सारीत मी राणीला विचारलं, " आता हे पुरे बाई. देवाला भेटायचंय ! कुठं आहे ग देव ? " इतक्यात आमच्या बाबांच्या एवढा मोठा माणूस त्या डोंगराच्या कुशीतून बाहेर येत म्हणाला, " हा बघ मी आलो. "

" आज तुला उजाडलं ? " सूर्यनारायणासारखा देव डोंगराच्या डोक्यावरून आल्यामुळं त्याच्या साऱ्या अंगाभोवती फिरणाऱ्या बिजलीकडे बघून मी आपल्याच दाताखाली जीभ चावीत त्याला विचारलं हसले. आभाळात चमकणाऱ्या विजलीला आपल्या भोवताडून दूर जायला सांगत देव म्हणाला, " हो, मला आज उजाडलं खरं. मी तुझ्यावर खूष झालो. काय पाहिजे बोल ! "

आता काय सांगू ह्या देवाला ? झगा दे म्हणू, बांगडया दे म्हणू, भावली दे म्हणू की चेंडू मागू नाही तर असलं नकोच काही. त्यापेक्षा आईला पैसे दे म्हणावं म्हणजे आईच सारं आणून देईल ! आणि म्हणून मी त्याला तसं म्हणताच त्यानं ' ठीक आहे ' करीत माझ्या डोक्यावर हात ठेवला तो रुपयांचा ढीगच्या ढीग पडला. तशी मी आनंदानं वेडी होऊन किंचाळले, " आईऽऽऽते बघ पैसे ! आता घरी चला...."

पण तेवढ्यात आईनं माझा कान जोरानं पिरगाळीत मला नीट उठवून बसवलं नि रागानं विचारलं, " बरडायला काय झालं ग ? माजी कामाव जायाची येळ झाली तरी तू निजलीयास ? ऊठ, घे चिंगीला अन् चल माज्या संगं !...."

मी डोळे उघडून समोर पाहिलं तो आमच्याच खोपीत निजलेली ! " म्हणजे ? देवाचं घर कुठाय ! " मी आईला गदागदा हालवली तशी माझ्या थोबाडीत मारीत ती एवढंच म्हणाली, " देवाच्या घरला जायाची घाई का झालीया तुला आई जित्ती असताना ? " आणि कामावर निघून गेली....चिंगीला मग पोटाशी आवळून धरीत मी किती तरी वेळ तिच्याकडे पाहात बसत पुटपुटले, " देवाला निजल्यावर उजाडलंवतं तर !....आता आला तर बरं उ हे ना। माझ्या खेळातून मी त्याला पार लांब फेकून देईन तरच नावाची यशोदी !...."

# ११. आमचे जग !

" ....प्रत्येक विद्यार्थी म्हणजे एक प्रचंड शक्ती आहे....त्याच्या हरएक कृतीमध्ये सामर्थ्य आहे....आपण त्या शक्तीचा, त्या सामर्थ्याचा वापर केला पाहिजे....राष्ट्र त्यामुळं जिवंत राहणार आहे. देश मोठा होणार आहे...."

आमच्या शाळेत आलेल्या पाहुण्यांच्या ह्या वाक्यांनी टाळ्यांचा गजर केला. बोललेली गोष्ट खरी असल्याचा जणू त्या दिवशी निर्वाळा देऊन टाकला; मी पण गप्प राहिले. टाळ्या वाजवल्या नाहीत. हसले नाही. कुणाशी बोलले पण नाही. मला हे बोलणं ढोंगी वाटलं. खोटं खोटं असं वाटलं. त्यामुळं आमची दिशाभूल होते असा माझा समज झाला. म्हणून सभा उठली तशी मी रोजच्यासारखी तडक घरी निघून आले. एरव्हीप्रमाणे मैत्रिणींच्याबरोबर रमतगमत आले नाही. नाही तर असली भाषणं झाली की त्यासंबंधी आम्ही खूप बोलत असू; पण हे वक्ते होते आमच्या ओळखीतले आणि म्हणून ते खरं बोललेच नाहीत या कल्पनेनं मी त्यांचं बोलणंही मानलंच नाही. जाऊं दे म्हटलं न् घरी निघून आले.

बिनबोभाट आम्ही मुलांनी मोठी माणसं सांगतील ती कामं मरस्तोवर केली की, आमच्या अंगी प्रचंड शक्ती असल्याचा म्हणे यांना साक्षात्कार होतो ! आहे की नाही ? आणि कामात जर का हयगय झाली तर मग लगेच 'मूर्ख'-पणाची पदवी तावडतोबीनं आम्हाला बहाल केली जाते. अशा वेळी आमच्या अंगचं सामर्थ्य ढगात जातं न् आम्ही नालायक ठरतो ! तर हा जिथं अनुभव जमेला आहे तिथं असल्या बोलण्याला कुणी भुलावं ? छे ! मी तर मुळीच भुलायची नाही. ह्या मोठ्या लोकांचं सगळं लक्ष आमच्या काम ऐकण्यावरच ! खेळायला देखील मग मोकळीक मिळेल तर शपथ !....अं हं !...म्हणून मला हे खोटं खोटं बोलणं खपतच नाही.

आता काल परवाचीच गोष्ट सांगते हं. आमच्या अंगणात लख्ख चांदणं पडलेलं. तर जेवण झाल्यावर आम्ही मुलं मुलं मजेत गोष्टी करीत बसलोवतो. त्या वेळी आमची गोष्ट ऐन रंगात आलीवती अगदी. म्हणजे आमचा थोरला दादा एका दगडावर बसलावता. त्याच्या भोवती आम्ही न् तो काय सांगतेला की, " असंच आपलं एक गाव होतं. तिथं असंच मोठं देखणं चांदणं पडलेलं. तर मुलं मुलं खूप खेळत बसलेली. नाचून पळून धिंगाणा घालतेली. तर त्या धांदलीत

यमुनेचा घाट चढून न् गौळणींची वाट सोडून भगवान् कृष्णदेव त्या मुलांत खेळायला आलेला हं !....तो खेळायला आलेला तर काय मज्जा ! त्याला बघून वरचे चंद्रसूर्यही खाली येऊन मुलांच्याशी खेळतेले !....म्हणताना रात्र किती झाली हे कळलंच नाही ! जसा चांदण्यांनी त्या पोरांच्या भोवती फेर धरला तशी वरची दुनिया खाली आली न् मुलांना अस्मान ठेंगणं झालं !....तर उभ्या गोकुळात त्या वेळी कृष्णाचा शोध झाला. मथुरेच्या लोकांनी गावोगाव जासूद पाठवले. पण कृष्णदेव कुठाय ? तो इथं मुलांच्यामधेच खेळतेला ! यशोदामाईला त्यासरशी पान्हा फुटला न् मार बसू नये म्हणून कृष्णदेव कोकणात जाऊन लपून बसला. तर काय गंमत की, चुटकी सरशी तो या इथला तिथं गेला न् यशोदामाईच्या दुधाच्या धारांनी तेवढी लांबची झेप घेत दूधसागर खळाळून सोडला !....कृष्णदेवाबरोबर चंद्र-सूर्यही पोटभर दूध प्याले !! ....आणि मग....मग काय गंमत झाली की, पहाट झाली म्हणताना चंद्रसूर्यही आभाळात पळाले न् त्यांच्या आंघोळीसाठी तिथं दूधसागर उभा राहिला !...." .... बाईबाई बाई ! तर ही गोष्ट चालली असताना हे महाशय काठी टेकीत आमच्या घरी येऊन एकदम खेकसले, "मुलांनी नुसत्या चकाट्या पिटत राहायचं म्हणजे मला नाही खपत. हल्लीच्या कार्ट्यांना वळणच नाही जसं !....अशानं अभ्यास राहतो बाजूला न् मुलं चावट होतात...."

झालं, आमच्यामधे स्वाभाविकच चुळबुळ उडाली न् आमची किशी पुटपुटली, "ह्यांना कोणी बोलावलंय आत्ता काही एक काम ऐकणार नाही म्हणावं !" तर बाई त्यांना असा राग आला की, "तू नाही तुझा बाप ऐकेल !" असा दम देत त्यांनी आमच्या घरात प्रवेश केला. त्यासरशी मग आम्ही त्यांचा थोडाफार निषेध नोंदवीत दुसरी गोष्ट सुरू केली. किशीनं आम्हांला म्हटलं कसं, "अरे की नाहीऽऽ रात्री मला मोठ्ठं स्वप्न पडलं हं ! मोठ्ठं म्हणजे निजल्यापासून पहाटेला घाबरून मी उठेपर्यंत पुरावं असं ! तर काय गंमत की, ढगांचा प्रचंड मेळा बसलेला. मेघगर्जना होतेली. ढगांचे रंग एकसारखे बदलतेले. आणिक अवचितच त्यातून एक हातभर लांबीची वस्तू खाली कोसळतेली ! कशी म्हणाल तर बैलांच्या शिंगासारखी. टोकाला पांढरीशुभ्र. मधे पिवळसर आणि बुंध्याला काळी पांढरी डागळलेली अशी....तर ती वरून आली ना, तर एकदम आमच्या तुळशीवृंदावनावर आपटली न् त्याची दोन भकलं झाली....तर त्यातन एकदम रक्ताचं कारंजं

उसळलं आणिक अंगणभर त्या रक्ताचा सडा झाला....झाला तर त्यातून बदकांचा, मोरांचा, पोपटांचा असा रंगीबेरंगी मेळा साजिवंत होऊन उठला न् अंगणभर त्याच्या पायातील घुंगूर झणकारले !....त्यासरशी तुळशीवृंदावनाच्या कट्टयावरून दोन सुंदर मुली उठल्या. जरतारी वस्त्रं ल्यालेल्या. कर्दळी कुंकुम लावलेल्या. चाफ्यांची वेणी घातलेल्या. मोगरीचे हार हातावर बांधलेल्या. त्या मोठ्या डामडौलानं तुरुतुरु खाली आल्या न् त्या नाचऱ्या पक्ष्यांच्या घोळक्यात जाऊन बसल्या. तशी एकदम आभाळ फाक करीत खाली आलं न् त्या सगळ्यांना घेऊन वर निघून गेलं....तर सांगायचं म्हणजे माझी वारलेली वहीण त्यात होती !....तिला बघून माझी तहानभूक हरपली न् तिला मिठी मारताना जसं हाताला काहीच लागेना तशी मी घाबरून उठले ! ''....

किशीची ही हकीकत आम्ही मिटक्या मारीत ऐकत होतो तर तेवढ्यात आमच्या काकांची हाक आली, " पुरे त्या आता गोष्टी. अभ्यासाला बसा. " आणि मग आईकडून चहा करून आणा, पानवाल्याच्या दुकानात जाऊन चुना-तंबाखू आणा, शेजारच्या कोंडीरामनानांना पत्ते खेळायला बोलावून आणा, ओसरी-वर प्यायच्या पाण्याचा तांब्याभांडं आणून ठेवा, असली भाराभर कामांची यादी पण त्यांनी एका दमात वाचली !....

काकांचं ऐकलं नाही की ते मारतात, हे ठाऊक होतं म्हणून आम्ही आमच्या सभेला पांगवलं न् सांगितली कामं उरकीत पुन्हा परसदाराला येत आजीला घेऊन बसलो. आमच्या आजीला गोष्टींचा नाद दांडगा. त्या कारणानं गोष्ट सांग म्हटलं की, आमच्याएवढे शहाणे आम्हीच असा ती अभिप्राय द्यायची न् आम्हाला घेऊन तास न् तास गोष्टी सांगत बसायची. तर त्या दिवशी पण तसंच झालं. त्या पावण्यांनी आमचा बेत उधळून लावायचे डाव काकांच्याकरवी कितीही आखले तरी आजीकडे कोणी फिरकलंच नाही ! नुसती लांबून बोलणी कानांवर यायची तेवढीच ! कारण आमच्या घरात आजीचा दरारा एवढा की, तिच्यापुढं कुणी सहजासहजी येतच नसे ! म्हणून आजी भेटली तशी आम्ही खुशालीत आलो न् मग मोठ्या माणसांच्या-प्रमाणं आमचं मुलांचं पण जग असतं याची त्या पावण्यांबरोबर काकांना पण खात्री पटवून दिली....

तर आजीनं गोष्ट सुरू करायच्या अगोदर आमच्या वत्सलानं मागच्या वेळी

आजीनं सांगितलेली गोष्ट आठवीत आम्हांला ऐकवली. कारण सांगितली गोष्ट मनात धरली नाही तर आजीला राग येतो न् मग ती गोष्ट अशी सांगतच नाही हे आम्हांला ठाऊक होतं. त्या कारणानं वत्सला म्हणाली कशी, " एक होती म्हातारी, ती खराट्यानं अंगण झाडीत होती तर तिच्या पायात आभाळ आलं हं ! आलं तर काय गंमत की, हिनं आपल्या हातातील खराट्यानं त्या आभाळाऊ धोपटलं न् चालता हो म्हटलं. तशी गप्‌किनी आभाळानं म्हातारीलाच मिठी मारली न् म्हातारी-सकट आभाळ वर गेलं !.... मग म्हातारीनं ढगांच्या पोरांना न्हाऊ घातलं. हरबरे भरडीत जेवण करावं म्हटली तर आभाळ गडगडलं न् ढगांच्या पोरांनी धुमाकूळ मांडला. त्यासरशी एका ढगानं सारं पाणी एकट्यानंच गिळून टाकलं न् तो काळाकुट्ट झाला. म्हणताना बाकीच्यांनी तक्रार केली. म्हातारीला राग आला. " अप्पलपोटा आहे मेला " म्हणाली. मग तिनं बाक्‌दिशी त्या काळ्या ढगाच्या पेकटात काठी घातली. तशी तो एकदम ओरडला न् त्याच्या तोंडातून पाण्याचा लोट बाहेर उसळला. त्या घटकेला म्हातारीनं झारी धरली न् मग उरलंसुरलं पाणी पाऊस होऊन उड्या घेत पृथ्वीवर आलं !.... झाली गोष्ट. "



वत्सलेनं सांगितलेली गोष्ट आजीला पटली न् मग माणूस हा गोष्टीवेल्हाळ

कसा असतो त्याच्या गमतीजमती तिनं सांगितल्या. त्यासाठी कथेकऱ्यांचे दाखले दिले. आम्हांला मग खूप मजा वाटली न् झोप येस्तोवर आजीला गोष्ट सांग अशी गळ घातली. म्हणताना तिथंच एक सतरंजी टाकून त्या ठिकाणी आम्हांला निजवीत आजी गोष्ट सांगणार तर ते पावणे पण तिथं येऊन बसले ! तशी आम्ही त्यांची अडचण नको म्हणून गलका केला. तर आजीनं त्यांना आमच्यापासून लांब बसवीत मधे मधे बोलू नका म्हटलं न् आम्ही मुलं किती चांगली आहोत त्याचं पोटभर वर्णन करीत तिनं आम्हांला गोष्ट सांगितली. ती गोष्ट अशी होती—

" सांगून कळायचं नाही. बोलून सुधारायचं नाही. ऐकून विश्वास बसायचा नाही. अशी ही गोष्ट. तिला लईदी झालंतं.

" मजी काय झालं की, एक राजा. त्याला एक राणी. गोरीपान-चंद्राच्या तेजाची. पण पोटी मूलबाळ न्हाई....ह्या पावण्यागतच ! "....आजीनं बोलता बोलता पाव्हण्यांचेकडे हात केला न् आम्ही चमकलोच हं ! पोटी पोरबाळ नाही म्हणूनच आमच्यावर त्यांचा दात असला पाहिजे असा तर्क करीत पाव्हण्याला आम्ही बरं झालं असं हाताची बोटं उडवीत पुटपुटलो. तर आजी पुढं ऐका म्हणाली म्हणताना पुन्हा कान दिला. आजी आमच्या अंगावर चादर पसरीत न् आम्हांला गोष्ट ऐकवीत निजा असं सांगून म्हणाली कशी, " तर त्या राजाचा राणीवर लई जीव न् राणीचा पण राजावर. पण पोरबाळ न्हाई तर विचारी कष्टी असायची हं !

" होता होता काय झालं की, राणी कणकीचे दिवे न् मुटके करीत बसली. देवीची पूजा बांधायची म्हटली. आणिक मग देवीला नवं जरीपातळ, जरीखण आणला. निवदाचं ताट भरलं न् स्वतः मध्यानराती पूजेला बसली.... बसली तर मग देवीनं तिला दर्शन दिलं. राणीनं देवीला दंडवत घातला. देवीनं आशीर्वाद दिला. काय पाहिजे म्हणाली. तर हिनं पोटी संतान मागितलं. तशी देवी बरं म्हटली. तिनं राणीनं आणलेल्यातलाच एक कणकीचा मुटका उचलून दिला. घरला ने म्हणाली. सोन्याच्या पाळण्यात घाल बोलली. आणिक त्येचं लगीन कर म्हटली. राणीनं कबुली दिली न् घरला आली. राजाला तिनं अशानं असं आहे म्हटलं न् पोटी पुत्र यायचाय तर लगीन काढा बोलली.

" पुढं मग असेच दिवस आले न् गेले. एक दिवस राजानं लेकाचं

लगीन काढलं....पाळण्याला बाशिंग बांधायचं म्हटला न् नजीकच्या एका राजाची लेक सांगून आली तर तिच्यासंगं लगीन ठरविलं.

" भला दांडगा मंडप घातला. ताशेतर्फे वाजले. नगार नौबत झडली न् नवरा बघायला नवरीकडची मंडळी आली. तर बाळ निजलंय म्हणून राणीनं सांगितलं न् स्वत: पाळण्याजवळ आली.

" मग लगीन लागलं. मानपान झाले न् राणी पाळण्यापाशी आली तर काय चमत्कार! "आईसाब!"....अशी हाळी देत त्या कणकीच्या मुटक्यातून राजपुत्र उठला. पाचसात वर्षांचा असा! देखणा. गोरापान. हिरेजडित अलंकार ल्यालेला. नाकेला. तजेलदार डोळ्यांचा. त्याला बघून राणीचं भान हरपलं न् राजा भुलून गेला. वऱ्हाडी मंडळी तर पाहातच राहिली न् मग सगळीकडे आनंदी आनंद झाला. त्यासरशी राणीला दूध फुटलं न् दोन्ही अंगाला नवी नवरा-नवरी पीत बसली! राणीनं मांडीचा चवरंग केला. हातांचा पाळणा बांधला. नेत्राचा दिवा लावला न् ती सोभागती झाली.

" राजाराणींनं मग सुखाचे दिवस पाहिले. तर ते तुम्ही आम्ही पण बघूया—"

आजीनं गोष्ट संपवली तेव्हा रात्र टळून गेलीवती न् मी सोडून सगळ्यांना झोप लागलीवती. म्हणून मी निजायसाठी आजीच्या कुशीत शिरणार तर पावणे डोळ्यांना रुमाल लावीत गहिवरलेले न् मुलांच्या अंगी जंगी सामर्थ्य असल्याची भाषा काकांशी करतेले!....

# १२. जुनी पुस्तकं नकोत!

साऱ्या मुलुखाची भांडकुदळ आहे म्हणून उभ्या गल्लीनं माझ्या नावाचा डांगोरा पिटलेला असला आणि आईनं द्वाड म्हणून माझी घरात बदनामी करीत चिंचेच्या फोकानं बडवीत माझी पाठ सोलून काढली असली, तरी पाव्हण्यांच्या पुढं मला शहाणी आहे असं म्हटलंच पाहिजे असा माझा दावा होता; पण माझं कुणी ऐकत नव्हतं. उलट मूर्खपणाचे सगळे शिक्के माझ्यावर मारीत सगळ्यांचा राग माझ्यावरच निघत होता. म्हणताना त्या दिवशी उगवतीनं तोंड वर करायच्या आधीच मी जी अंथरुणातून उठले ती थेट आमच्या दारातील लिंबोणीवर चढून बसले. तिथं वाकलेल्या आंब्याच्या झुबकेदार डहाळीच्या मागं तोंड लपवून कोणी बघणार नाही याची खात्री करून घेतली. तर तेवढयात काय झालं, की उगवती वर आली न् कोवळ्या किरणांनी नेमका दावा साधला. माझ्याच अंगावर ऊन चकाकलं. त्यामुळं मी आणखीनच अंग चोरून बसणार तर तितक्यात शेजारच्या फांदीवरून उडून गेलेला कावळा आमच्या घराच्या छपरावर बसून ओरडला. तशी मी पण ओरडले, 'काव काव सोन्याचा पाव. पावणा येणार असेल तर उडून जाऊ नको. पावणा यायलाच नको मुळी. मला शिव्या बसतात. कामं केली तरी मार बसतो. कुणाचा म्हणून कुणाचाही सरळ शब्द नाही, मग सांगितलंयच कुणी कामं करायला न् ज्याचं त्याचं ऐकायला! आता नाहीच ऐकणार. एवीतेवी मी मूर्खच आहे तर मग पक्की होऊ दे. खुळी आहे म्हणून नाही लगीन झालं तरी चालेल एक वेळ, पण आता बोलून घेणं बंद म्हणजे बंद!!" तर काय मेलं! ज्यानं उठावं त्यानं मलाच बोलायचं. म्हणजे कोंडा देऊन आणलीय काय मला तेव्हा हा छळवाद? बघा तर खरं. आई असली म्हणून काय झालं? त्या दिवशी पाव्हण्यांच्या देखत तिनं माझ्या अंगावर पाटी फेकावी काय लिहायची? अं हं! मला नाहीच खपणार हे पुन्हा. मुळीच नाही. अक्काचे भाऊजी काय म्हणाले असतील न् मामासाहेबांनी काय पारख केली असेल ठाऊक आहे हिला? घर आहे का सोंग आहे वाटलं असेल त्याना. शप्पथ! नुसता चिलमीवर विस्तव द्यायला उशीर झाला हा काय एवढा गुन्हा झाला काय मी म्हणते? सोप्यातून माळीत न् माळीतून स्वैपाकघरात जाऊन यायला थोडा तरी वेळ लागेल का नाही? मी काय इंजिन आहे तर बसल्याजागी हां म्हणताच कामं व्हायला? काही नको

यांचं मला. आता जेवायची नाही. बघू या कोण दमतं? अशी इथं बसून राहीन. मग कुणाला काय म्हणायचं असेल ते म्हणू दे खुशाल! अगदी!

इथं जेवायला मिळायचं नाही ठाऊक आहे मला. पाणी प्यायला मिळायचं नाही माहीत आहे मला. पण म्हणून काही भ्यायची नाही मी! अं हं!! कैऱ्या खाईन वाटलं तर, नाहीपेक्षा राघुमैना आणून देतील ते खाईन! वेळेला चिंचेची पानं खाऊन राहीन पण भाकरी आण म्हणणार नाही. पलीकडच्या बागेतील नारळीला सांगीन, की पाणी आणून दे म्हणून. बस मग. काय तर! उगीच आपलं कुणीही आलं, की आमच्या दंगेखोरपणाचा पाढा वाचायचा म्हणजे? आम्हांला नाही खपत हे. मुळीच नाही.

परवा ते आबासाहेब का कोण आले, तर मी त्यांना चटकन् प्यायला पाणी दिलं. तांब्याभांडं नीट आणून चहा नेऊन दिला. चिलमीला विस्तव दिला. बाजारात जाऊन पानं आणली खायची. तर मुलगी किती शहाणी आहे असं ते म्हणाले मात्र आणि लगेच "तुमच्यापुढं बरी वागतेय. एरव्ही काम ऐकेल म्हणता काय? नाहीबा! लई वंगाळ कार्टी. नुसते जिभेचे चोचले घ्या बघून." आई हा शेरा मारून मोकळी झाली की!! तरी त्या पाव्हण्यांनी, 'पोराची जात आहे, चालायचंच, पण आमच्या मुलांपेक्षा ही चलाख आहे, म्हणाल ते बिनबोभाट ऐकते.' असा उलटा अभिप्राय देत मला शाबासकी दिली. घ्या म्हणजे! त्यावेळी असा राग आला आईचा, की दिसेल त्यानं ठोकावी वाटली. पण ठोकतेय कुणाची? परवा एक शिवी दिली तर ओल्या चिपाडानं तिनं मला बेशुद्ध होईस्तोवर मारली न् मग असं केल्यावर तर जिवंत राहायची आशाच नको. म्हणून मी आपला तिथून पाय काढला न् गेले गजगे खेळायला गल्लीतल्या शांतीकडं. करू काय मग?

पण बाई हे असलं तरी कुठंवर चालावं आणि मी तरी कुणाच्या घरी किती पळ काढावा? लोक काय म्हणतील? बरं, या गोष्टीला काही वेळकाळ तरी आहे? छे! एकदा तर मी भल्या पहाटेलाच चिंगीच्या घरी गेले निघून. झोपताना रात्री डोक्याला घातलेलं खणाचं टोपडं पण तसंच! सगळी माणसं हसली. रोज रोज दळणाला हात देऊन फोड आले हातावर तरीही दळायला काय सासुरवाशीण पडले मी? हातातून रक्त आलं तरी म्हणेल दळू लाग! मी नाही ऐकायची पण. नाही म्हणजे नाही. म्हणून म्हणते की, आता हे असलं बास. आहेच खट्याळ मी तर मरू दे इथंच झाडावर. म्हणजे सुटली सगळी न् मी पण.

चांगलं शाळेला जाते म्हटलं तर पुस्तकं घ्यायला माझ्याएकी तेवढा पैसा नाही काय? नाही तर नसू दे. मला पण जुनी पुस्तकं नकोत. फाटकी न् तुटकी. कुणी वाचलेली. कुणाच्या पण हातात घोळलेली. नकोच त्यापेक्षा शिक्षण.

जुनी पुस्तकं माझ्याकडं यायची ती सगळा जुनेपणा घेऊन. त्या पोरांनी खाल्लेल्या शिव्यांचा भारा उचलून नाही तर नापासाचे शिक्के छापून. कुणी सांगितलाय एवढा खटाटोप! फटकळ तोंडात जीभ नसती म्हणतात त्याप्रमाणे फाटक्या पुस्तकात तरी दम उरलेला असणार काय? नाही ग बाई. घरच्या लोकांच्यापेक्षा तोंडाळ होऊन येणार ती. नको त्यांचं नको ते बोलणं आणणार ती.




मला नको बाई. मधे त्या ठमीगत व्हायचं नाही तर. जुनं पुस्तक चार आण्यात घेऊन आली न् मग कळलं, की ते पुस्तक ज्यांनी ज्यांनी घेतलं ती मुलं पासच झाली नाहीत किंवा त्यांनी घरच्यांचा मार खाल्ला नाही असं घडलंच नाही. म्हणजे आली का पंचाईत! इथं घरात दुष्काळ आहे अगोदरच, त्यात हा तेरावा धोंडा! सांगितलंय कुणी या फंदात पडायला? खरं का खोटं?

माझं म्हणणं, जसं फाटकं पुस्तक जुनं म्हणून नको तसंच मागं काय काय घडलं त्याची पण पोथी कुणी वाचायला नको. झालं ते सोडून द्यायचं न् पुढं व्हायचं हे वडील माणसांनी आम्हांला सांगण्यापेक्षा आपण का नाही अंमलात आणू? सारखी आपली खोटीनाटी जुनीच कहाणी उगाळीत बसायची म्हणजे? त्यापेक्षा गुणांची बेरीज करा की म्हणावं! मग बघा तुम्ही का आम्ही सरस ठरतो ते! नाही होऊंदेच एक वेळ. आमच्या वयात तुम्ही काय दिवे लावले असतील

ते कुणी आठवून सांगितलं तर मग का राग येतो? मिरच्या झोंबतात की अगदी नाकाला! कसं झिणझिणतं मग? आम्हांला पण तस्साच राग येतो. म्हणून तुम्हांला तुमच्या आयुष्याची जुनी पुस्तकं उघडायला नकोत ना, मग आम्हांला पण आमच्या बाबतीत तेच म्हणायचंय. अगदी थेट तस्सं! तुमच्यासारखंच. आम्हांला पण नाही आवडत आमचं उणंदुणं काढलेलं.

शाळेतल्या बाईंनी आम्हांला नावजलं, की तेवढं बरं वाटतं न् घरात आलं की, आमचा राग येतो काय? लगेच फरक पडतो एवढा आमच्यात? दोनाचे चार हात होतात की पायांना शिंगं फुटतात आमच्या म्हणून असा दुस्वास?

जाऊ दे. त्या रखमीसारखा हात नाही तर पाय मोडू दे माझा पण. बघू मग कुणाच्या डोळ्यांत पाणी येतंय का?

पण नको बाई. आपलं करील कोण मग सगळं? आजीसारखी थोडीच मायाळू आहे आमची आई?

थांबा, आता खरंच इथून हालत नाही. तो बघा दिंडीदरवाजा वाजला न् कुणी तरी पाव्हणे पण आलेच हं! ते पाहा. अग बाई! दोन तीन पुरुष न् दोन बायका? झालंच तर पोरंही दोन चार संगं आलीत वाटतं? आता बघू यांची ऊठबैस कोण करतंय ते!

ती बघा आईची हाक आलीच! बैस म्हणावं खुशाल. माझं नडलंय तुझं काम करायला न् वरती बोलून घ्यायला! जा!! येत नाही.

यांना दात घासायला मिश्री द्या, तोंड धुवायला पाणी द्या, आंघोळीला पाणी काढा, चहा करून द्या, त्यांचं धुणं धुऊन या, ते सांगतील ते ऐका....हाय रे भगवान! सांगितलाय कुणी हा नखरा? आम्हांला पाव्हण्यांचा खाऊ पण नको न् त्यांच्यासाठी राबणं पण नको. बसू देत खुशाल. घेऊ दे आईला बघून. मी आपली इथंच बसणार. शिव्या तरी वाचल्या हे काय कमी झालं?

अं? अग बाई! मामा मामी आलेत? आणि किशी गोविंदा? ये ऽऽ थांब ग ये ऽऽ किशे ऽऽऽ ही बघ आलेच मी!....

समोर मामांची किशी वेणीला सोन्याचा गोंडा लावून आलेली पाहिली मात्र न् मग मी धपदिशी लिंबोणीवरून उडी घेत घरात पळाले. तशी माझं ध्यान बघून आई माझ्यावर एकदम खेकसली कशी, "एवढा वेळ होतीस कुठं कार्टे ऽऽ"

पण मग मी उत्तर केलंच नाही. मामांच्याजवळ जाऊन त्यांच्या कमरेला मिठी मारली आणिक मला आजोळी घेऊन चला म्हणाले. तर तेवढ्यात मामीनं माझा गालगुच्चा घेत मला विचारलं, "बरं हाय न्हवं बाळ?" त्यासरशी मी मामीच्या अंगावर झेपावले न् तिनं पण मला पोटाशी आवळून धरीत माझा मुका घेतला. म्हणताना माझ्या मनातला राग कुठल्या कुठं पार पळून गेला आणि सारी कामं मी कशी बिनबोभाट करीत गेले.

तर दुपारी मळ्यात गेल्यावर धुण्याची मोट उलगडताना पाटाच्या पाण्यात उतरलेल्या मला आई कशी म्हणती, "का? असं रोज केलंस तर?...."

त्यावर मी आईला फार बोल्द दिलं नाही. जुनी पोथी वाचू नकोस म्हटलं आणि शाळेला घालीव, नाही तर जीव देईन असा इशारा देऊन टाकला.


पण झालं काय की, आमच्या मामारायांनी नेमकं ते ऐकलं न् स्वतः मला शाळेत घालायची हमी देत आईला म्हटलं कसं, "पोरीला संगं घेऊन जातो. उगं रकरक नगं तुजी!" त्यासरशी एकुलत्या एका मला उराशी धरीत आईनं घारीगत माझ्यावर झेप घातली न् म्हणाली कशी, "नगं नगं, माजं काळीज हाय ही. तिला न्हेल्याव आभाळ फाटून जाईल गा!...." आणि मग रडून रडून तिनं मला एवढी न्हाऊ घातली की, आई वाईट्ट आहे हा माझा गैरसमज त्या गंगेत बुडून गेला. साता नवसाच्या मी तिच्याबद्दलचा राग मनातून काढून लांब लांब फेकून दिला न् आईला माझ्यावर रागवत जाऊ नकोस म्हणून बजवायच्या अगोदर मी आपल्यालाच दटावलं, "ये ऽ फेकून दे ती जुनी पोथी. आई वाईट नाही. चांगली आहे. आपण तिचं ऐकायचं. शहाणं व्हायचं. काय? नाही तर माझ्याशी गाठ आहे देवा!...." आणि आईच्या कुशीत शिरून जो जोराचा श्वास घेतला तो हळुहळू कधी गडप झाला ते कळलंच नाही. आईच्या मायेच्या उबीनंच जीव एवढा हरखून गेला की, त्यापुढं मामाच्या घरच्या नखऱ्यानं फिक्कंच पडावं!....न्हवं खरं का खोटं?

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. वाचनालय शाखा.
अनुक्रम .. . ...दि ... ... ..
क्रमांक... .........नोंद दि...............

# १३. निळ्या कागदाचा तुकडा

गौरी-गणपती यायच्या आधीची गोष्ट. आमच्या आईबरोबर मी मुंबईला गेले होते. त्या वेळी माझं असं कोणतंच काम नव्हतं. काम होतं ते आईचं. आणि तिला सोबत म्हणून तिनं मला नेलं होतं. त्यामुळं ती जाईल तिकडं मी तिच्या पाठीशी असायची. ती खाईल तेच मला खावं लागायचं. ती झोपली की मी झोपायची आणि ती उठली की मी उठायची, असा आमचा ऊन्ह-सावली-सारखा खेळ चालू होता.

पण काही झालं तरी आमची आई मला एका ठिकाणी नेत नसे. “ इथं तुला नाही नेता येणार ” असं ती म्हणायची आणि एक निळ्या कागदाचा तुकडा माझ्या हातात देऊन सांगायची, “ आता तू माडीवर जाऊन बैस. मी बाहेर आले की तूही खाली ये. मग आपण चहा घेऊ. ” मला मुकाटयानं ते ऐकावं लागे. नाही तर ना ओळख ना पाळख. जाणार कुठं मग ?




आईनं सांगितल्याप्रमाणं त्या निळ्या कागदाच्या तुकडयाच्या आधारावर खरंच मग मी माडीवर जाऊन बसे. तिथल्या खुर्चीवर नीट बसून आसपास माणसांच्याकडे मधून मधून बघत मी गॅलरीतून हळूच खाली बघत असे. मोठ्या सभागहात

आमची आई आमदार म्हणून थाटात बसलेली दिसे. मी चोरून तिच्याकडे बघे; पण तिचं लक्ष माझ्याकडे नसायचं म्हणून हिरमुसून जाई मी....

पण एक झकास जरीचा तांबडा पोषाख केलेला माणूस हातात चांदीची काठी घेऊन आला आणि घंटी दाबत बसलेल्या माणसानं काही म्हटलं की, सारी माणसं उठून उभी राहात त्या वेळी मला मजा वाटे. कारण आम्ही शाळेत गुरुजी आल्यावर उठतो व नमस्कार करतो तशी ही मोठी माणसं हात जोडीत ! त्या वेळी खुदकन् हसत आई माझ्याकडे बघायची नि मग माझा रुसवा पार निघून जायचा.

त्या मोठ्या घरातील माणसं काय बोलत ते मला कळत नसे. फार अवघड होतं सारं. पण लाउडस्पीकरमधला त्यांचा नुसता आवाज ऐकण्यातही माझं मन रमून जाई. मोठ्या खुर्चीवर बसलेल्या माणसानं काही सांगितलं की, एखादा उठून बोलायला लागे. त्याचा आवाज ऐकत मी सगळीकडे पाहायची, तरीपण माझं लक्ष असायचं आईकडे. तिच्या शेजारी बसलेल्या गुजराथी बाईबरोबर ती सारखी बोलायची. त्या एकमेकींकडे बघून हसायच्या. एकमेकींना चिठ्ठी लिहायच्या. हळूच मागच्या बाकावरच्या माणसांशी बोलायच्या. कधी मधूनच उठून पलीकडच्या जाग्यावर जाऊन कुणाशी तरी बोलायच्या. अशा वेळी मला वाटायचं, त्यांनी मला हे सगळं सांगावं, मला चिठ्या दाखवाव्यात. तिथूनच घटकाभर का होईना माझ्याशीही बोलावं. एखाद्यानं आपल्या बाकावरच्या कागदावर काढलेली चित्रं मला वर आणून द्यावीत !....पण माझं कोण ऐकणार ? आणि मी तरी एवढ्या लांबून सांगणार कुणाला ?.... माझ्याजवळ लाउडस्पीकर थोडाच बसवला होता ?

एखादे वेळी त्या मोठ्या खुर्चीवरच्या माणसानं काही म्हटलं की, सगळी माणसं एका आवाजात 'आय' म्हणून ओरडायची ! तर पलीकडची थोडी माणसं 'नो' म्हणून ओरडायची ! मला त्यातलं काही कळलं नाही तरी गंमत वाटत असे. आम्ही पोरं शाळेच्या आवारात छप्पापाणी खेळताना ओरडतो तसंच हे काही वाटायचं ! आणि म्हणून मग लहर लागली की मीही ओरडायची त्यांच्या-बरोबर....

एकदा काय मजा झाली की, पटापटा सगळी माणसं आपल्या जागेवरून उठली आणि मागच्या बाजूच्या खोलीकडं निघाली. मला वाटलं मला सोडून आता आई मागच्या दारानं निघून जाणार ! आणि त्याच धास्तीनं मी धावत पळत खाली आले आणि आई जिथून त्या मोठ्या खोलीत जात होती त्या दरवाजाजवळ

आले तो तो बंद झालेला ! माझ्या काळजात धडकी भरली. आई तिकडच्या तिकडेच गेली तर ?....मला काहीच सुचेना. शेवटी एका शिपायाला मी विचारलं, " माझी आई कुठाय ? " तर तो म्हणाला, " मत द्यायला गेलीय ! " आणि ते ऐकल्यावर तर मला चक्कर आल्यासारखी झाली. मत द्यायला जायचं म्हणजे भारी गडबड, धांदल ! दाटीवाटीतून जायचं. एका दारानं आत शिरायचं आणि दुसऱ्या दारानं परत यायचं ! आईला मत द्यायला लोक आले होते तेव्हाची ही गोष्ट मला माहीत होती. म्हणूनच मी घाबरून गेले. आई नक्कीच तिकडच्या दारानं जाणार याची मला खात्री झाली....

मी पुन्हा माडीवर पळत निघाले. पण एक पायरी चढत असतानाच मला आठवलं की तो निळ्या कागदाचा तुकडा कुठं तरी हरवला होता !....आता काय करणार ? आईला लांबून बघायला मिळायचं ते तरी आता कसं जमावं ? मला रडू कोसळलं. मी माघारी वळून माझा रुमाल तोंडाला लावला आणि मुळुमुळू रडू लागले....माझ्या डोळ्यापुढं आई दिसू लागली.

शेवटी एका लांबच्या कोपऱ्यात जाऊन रस्त्यावर उभी राहिले. त्या निळ्या कागदाच्या तुकड्यानं दडी मारल्यामुळं माझ्या आईपासून रानावनात ढकलल्यासारखं झालं मला....मी रस्त्यावरून पाहिलं तो आई बसली होती तिथं दिवे लागले होते. आई जिथल्या तिथं असल्याचं मला नक्की दिसत होतं. माझा आनंद गगनात मावेना. उड्या मारून मी आनंदानं टाळ्या वाजवल्या. इतक्यात एका पोलिसानं मला बजावलं, "इथे नाही उभं राहायचं ! तू आत जा. " पण माझ्याजवळ तो निळ्या कागदाचा तुकडा नसल्यामुळं मी आत जाऊ शकत नव्हते आणि दुसरीकडं कुठं जायचं हे मला माहीत नव्हतं ! म्हणून मी त्याला भीतभीतच म्हणाले, " तुमचा तो निळ्या कागदाचा तुकडा द्या म्हणजे मी जाते. " त्यावर तो म्हणाला, " मला नाही लागत पास ! "

" म्हणजे ? मग मलाच कशाला पाहिजे ? " मला काही कळेना. क्षणभर विचार करून मी दाबून तशीच पळत निघाले-आणि माडीवर जाऊन बघते तो सारी माणसं जाग्यावर; पण आईचा पत्ता नाही ! मी कावरीबावरी झाले. " आई कुठं गेली ? " मला कळेना. पुन्हा माझ्या छातीत धस्स झालं !....मी पुन्हा रस्त्यावर आले तो पोलिसानं अडवलं. त्याला काहीतरी थाप मारायचा माझा

विचार होता; पण मी गप्प बसले. चित्रासारखी त्याच्यासमोर उभी राहिले आणि विचारलं, " माझी आई कुठं आहे ? "

त्यावर त्यानं विचारलं, " इथे कुठली तुझी आई ? घरी असेल बघ जा. " आणि मग मी त्याला माझ्या आईची गोष्ट सांगितली तेव्हा तो म्हणाला, " आत जाऊन बघ...." आणि त्यानं मला सोडून दिली. माझ्या जिवात जीव आला. मी पळत पळत आत आले तो आई समोरून येत होती. मी आधाशासारखी तिच्या अंगावर झेप घेतली; पण तिनं मला नेहमीसारखं जवळ न घेता एकदम म्हटलं, " हा पास घेऊन वर जाऊन बैस. मी थोडी बाहेर जाऊन येते कामासाठी. " आणि ती तडक निघून गेली. तिला घाई होती म्हणून ती गेली; पण माझे डोळे डबडबले. घाबरून गेल्यामुळं छाती फुटते आहे की काय असं वाटलं. मी तो निळ्या कागदाचा तुकडा—म्हणजे पास—दोन्ही हातांनी फाडून टाकला.... मला सभा बघायची नव्हती. माझ्या आईला पाहात बसायचं होतं! तीच तिथं नसल्यावर वर जायचं कशाला आणि लोकांची माणसं बघून करायचं तरी काय?....

मी सरळ धावतपळत आईला गाठली आणि तिनं रागावून बडवलं तरी चालेल याची मनाशी पक्की खूणगाठ बांधून तिला एवढ्या जोरात कडकडून मिठी मारली की, पुढे ती माझ्याशी काय बोलली हे ऐकू येण्याइतकं देखील भान मला त्यावेळी राहिलं नाही....

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठा. वाचनालय शाखा
अनुक्रम ... वि. ...
क्रमांक ... नोंद दि. ...

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा
वा. क्र. ..३२२९ नों दि ..............
वि. ... क्र. ..............

IRBK-0112281